SDM/PUNE/SR/582/2012
website:www.sagunatrust.org
Email:shobhakarande62@gmail.com
मूल्य : ३० रुपये । वार्षिक वर्गणी : १०० रुपये
जा-फे-मा २०१३

# सगुणा

संपादक
शोभा करांडे

कार्यकारी संपादक
उद्धव धुमाळे

संपादकीय । २
झोत । आधुनिक जगापासून पूर्णपणे तुटलेल्या ग्रामीण महिला । प्रा.फकरुद्दीन बेन्नूर । ७
शोध-बोध । तारतम्य हवे । शोभा करांडे । १०
परामर्श १। पुरुषांना आता मानव बनवण्याची गरज येऊन ठेपली आहे । प्रा. नुतन माळवी । १५
परामर्श २ । समतेसाठी आपण पुरुष । प्रतिभा शिंदे । २०
आरोग्य संपदा । मुलींचे आजार आणि उपचार । डॉ० सुवर्णा तांबडे । २२
वेध १। शहरातलं शहर। मुक्ता सोनवणे । २४
रिपोर्ताज । निसर्ग मानव केंद्रित लोकांची चळवळ । अरुण करांडे । २८
मागोवा । जाहिरातीचे जग आणि स्त्रीवास्तव । रमा सावरगावे । ३१
वेध २ । लोकप्रिय चित्रपटातील मुस्लीम पात्रे । शरिफा बाले । ३५
कविता । शोभा करांडे, उमा ढेपे । ३८
पाककृती । वासंती ढवळे । ४०

संपादकीय पत्रव्यवहार : सगुना चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट,२०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजच्या पाठीमागे, पुणे. ४११ ०३० दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५, ०९८२०२३५०३०

हे त्रैमासिक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एटंरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून, सगुना चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट,२०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, (एस.पी. कॉलेजच्या पाठीमागे) पुणे. ४११०३० येथे प्रकाशित केले.

# संपादकीय

'सगुणा'चा हा पहिला अंक, जानेवारी महिन्यात आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. कारण याच महिण्यात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. महाराष्ट्राचा इतिहास घडवणाऱ्या या दोन शिल्पकारांना 'सगुणा'च्या वतीने विनम्र अभिवादन! तसेच राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती व 'महिला मुक्ती दिना'निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्राच्या पहिल्या शिल्पकार राष्ट्रमाता जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथे झाला. निजामांचे सरदार असलेले पुण्याचे जहागिरदार शहाजीराजे भोसले यांच्याशी विवाह झाला. पुण्याहून जवळच असणाऱ्या देहूचे संत तुकाराममहाराजांच्या प्रबोधनातून व इ. स. १६०० साली निजामशाहीचे परकीय आक्रमणापासून रक्षण करुण जे राज्य मलिक अंबरच्या कार्यातून स्थापन झाले, त्यातून प्रेरणा घेत मुगलसत्तेच्या दमनाविरूद्ध संघर्ष करुण रयतेचं राज्य निर्माण करण्यास छत्रपती शिवाजीमहाराजांना जिजाऊंनी मार्गदर्शन केले.

रयतेचं राज्य स्थापन केल्याबरोबर हजारो हेक्टर जमीन लोकांना कसण्यासाठी दिली गेली. या धोरणामुळे जमीन कसणारे, काबाडकष्ट करणारे शेतमजूर पहिल्यांदा जिजाऊंच्या समतावादी विचारांमुळे जमिनीचे शेतीचे मालक झाले. अशा प्रकारे छ. शिवाजीमहाराजांचा शेतकरी मावळा संकटाच्यावेळी लढाईसाठी सज्ज असायचा व इतर वेळी तो सर्व कुटुंबांसमवेत शेती काम करायचा. यामुळे जनता स्वावलंबी झाली होती. या कार्यातून खऱ्या अर्थाने लोकांचे राज्य आणण्याचा पहिला प्रयत्न झाला, म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ असे संबोधण्यात आले.

राष्ट्रमाता जिजाऊ नंतर तब्बल २३२ वर्षांनी ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव या गावी खंडोजी नवसे पाटील व लक्ष्मीबाईंच्या पोटी सावित्रीबाईंचा जन्म झाला. वयाच्या नवव्या वर्षी लग्न झालेली ही चिमुरडी सावित्री ज्योतीबा फुले झाली. तेरा वर्षांचे ज्योतीबा फुले फुरसुंगीच्या गोविंदराव क्षिरसागरांचे पुत्र. पुण्यामध्ये फळाफुलांची शेती करू लागले व 'फुले' झाले. लहानपणीच आई वारलेल्या जोतीरावांची देखभाल, सांभाळ त्यांची

मावसबहीण 'सगुणा' करायची. ते तिला 'सगुणा आऊ' म्हणायचे.

'सगुणा' पुण्यामध्ये शिक्षित कुटुंबातल्या मुलांना सांभाळायला जायची. तिथे ती मराठी, इंग्रजी विषयात प्रगती करत होती. ती घरी ज्योतीबांना पण ते सगळं ज्ञान शिकवायची. वाचनाची, अभ्यासाची गोडी सगुणाने ज्योतीबांना लावली. अशी शिकण्याची व शिकवण्याची आवड असणारी सगुणाआऊ सावित्रीबाईंच्या सासरी होती. जिच्या डोळस मायेच्या सावलीत ज्योतीबा मोठे होत होते, त्याच छत्राखाली सावित्रीबाई आल्या अन् सगुणाआऊ दोघांच्या आई झाल्या. अशा वातावरणात वाढणारी ही संवेदनशील मुलं, पुण्यातल्या सामाजिक वातावरणाचा पण सूक्ष्मपणे अभ्यास करत होते.

काळ बदलला होता. फुल्यांचा काळ म्हणजे, शेतकऱ्यांच्या हातच्या जमिनी सावकारांच्या हातात जाण्याचा होता. जिजाऊमुळे मिळालेल्या जमिनीचे मालक झालेले शेतकरी (छ. शिवाजीमहाराजांच्या मावळ्यांचे वारसदार) पुढे ब्रिटिश काळातील 'नगदी कर पद्धती'मुळे कर्जबाजारी झाले होते. नगदी कर पद्धतीमुळे निर्माण झालेला सावकारवर्ग शेतकऱ्यांची जमीन गहाण ठेऊन कर्ज द्यायचे. कर्ज आणि कर्जाचा वाढता व्याज यामुळे शेतकरी नाडला गेला होता. याच काळात शेतीचे मानवकेंद्रित स्वरूप बदलून बाजार केंद्रित बनत होते. गावगाडा सैलावला होता. या होत गेलेल्या बदलात सर्वांत जास्त नडले ते स्त्रीला.

'स्त्रीशूद्रादिशूद्रा'च्या हातचे रोजगार हिरावल्या गेल्यानंतर नव्या व्यवस्थेत रोजगार मिळवायचे झाल्यास शिक्षणाची निकड होती. नोकरीची संधी शिक्षित समाजाला होती. हे लक्षात घेऊन सर्व 'स्त्रीशूद्रादिशूद्रां'ना शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी क्रांतिज्योती सावित्री व महात्मा ज्योतिबा फुले बहुजनांच्या शिक्षणासाठी भर देतात. हातचे रोजगार गेलेल्या स्त्रियांना नव्या व्यवस्थेमध्ये भक्कमपणे उभे राहण्यासाठी शिक्षणाची दारे खुली झाली पाहिजे, यासाठी सतत संघर्ष करतात व पर्यायही उभा करतात.

स्वातंत्र्यपूर्व शंभरवर्षांपूर्वीचा हा काळ. त्याकाळातील समाजाची अवस्था व त्या समाजामधल्या या स्त्रिया, 'सगुणाआऊ व सावित्रीबाई'. सगुणाआऊची शिकवण्याची तळमळ, आवड व क्षमता लक्षात घेऊन सावित्रीबाईंनी १ मे १८४७ रोजी मागासवर्गीय वस्तीत पहिली शाळा काढली. सगुणाआऊ दलित मुलांना अक्षर ओळख व इंग्रजीसुद्धा शिकवू लागल्या. पुढे सावित्रीबाईंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडेवाड्यात 'पहिली मुलींची शाळा' काढली.

'विद्याज्योती' सावित्रीबाईंचं स्वयंभू कर्तृत्व आपण जेव्हा अभ्यासायला लागतो, तेव्हा त्यांची दूरदृष्टी व समताधिष्ठीत समाजनिर्मितीबद्दलची तळमळ पाहून त्यांच्या कामाला संवेदनशिल माणूस (स्त्री पुरुष) आपोआपच जोडून घेतो. शिक्षण हाच माणसाचा 'तिसरा डोळा' हे समाजाला समजावणारे, प्रश्न जागे झाल्याशिवाय उत्तरं शोधली जात नाहीत, असे सांगून प्रश्न उठवणारे, धर्म-जातिव्यवस्था या सर्वांची कठोरतेने चिकित्सा करणारे, चुकीच्या गोष्टींच्या मुळावरच घाव घालणारे, समतेची संकल्पना समाजात रुजवण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे आणि शंभर वर्षांपूर्वी कृतीतून समतेचा विचार राबवणारे क्रांतिज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतीबा फुले.

देशाचे भाग्यविधाते कोण? 'स्त्रीशूद्रादिशूद्र' म्हणजे सर्व उपेक्षित समाजाचा भारताचा भाग्यविधाता आहे. सर्व शेतकरी समाजच देशाचा पोशिंदा आहे. ही भूमिका खंबीरपणाने घेऊन शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या 'शेटजी-भटजी-लाटजी' विरोधी म.

फुल्यांनी आंदोलने उभी केली.

गिरणी कामगारांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणाविरुद्ध कामगार संघटना बांधण्यासाठी नारायण मेघाजी लोखंडे यांना मुंबईला पाठवले. स्त्रियांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून मुक्तीचे मार्ग शोधले. सामाजिक विषमतेसाठी जी सांस्कृतिक हत्यारे उभारले जातात, त्याविरुद्ध संघर्ष केला. इंग्रजी वसाहतवाद्यांनी भारतातील माणूस केंद्रित शेती उत्पादन बाजारपूरक करायला लागल्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची दखल घेत त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' लिहिला. शंभर-दीडशे वर्षांपूर्वी शेती प्रश्नांचा विचार करणारे म. फुले आजही मार्गदर्शक म्हणून उभे राहतात. यातच त्यांची निर्भय दूरदृष्टी दिसून येते. शेतिव्यवस्था व त्यामध्ये होणारी स्थित्यंतरे हेरून त्याबाबतीत विचार करून सुशिक्षित सुविचारी शेतकरी कसे निर्माण होऊ शकतील, याचा विचार त्यांनी तेव्हा केला होता.

पर्यावरण, लोकसंख्या वाढ याबाबतीतसुद्धा महात्मा फुल्यांचा परखड अभ्यास होता. शेतिव्यवस्था भांडवलशाहीला सामोरे जाणारा तो सुरुवातीचा काळ व 'ज्योतीसावित्री'चे कार्य हा खरं तर खूप खोल विचार करायला लावणारा विषय आहे. समाजाच्या दुर्दैवी अवस्थेची नेमकी कारणे शोधून त्यावर नुसते ठोस उपाय न सांगता ते अमलात आणण्यासाठी रात्रंदिवस राबणारे म. ज्योतिबा व सावित्रीबाई फुले हे पुढच्या सर्व सामाजिक चळवळीचे जनक व दिशादर्शक म्हणून त्यांच्या कार्याकडे बघावे लागेल.

समाज व्यवस्थेमध्ये महत्त्वाच्या ठरणाऱ्या प्रत्येक विषयामध्ये या विचारवंताचे जे आकलन होते, ते काळातीत ठरते. पाणी, जमीन या विषयांवरचा त्यांचा दांडगा अभ्यास आपल्याला 'शेतकऱ्याचा असूड'मध्ये दिसतो. महात्मा ज्योतीबा व सावित्रीबाई फुलेंनी 'स्त्री' शिक्षणाची सुरुवात तर केलीच, पण त्याहीपुढे जाऊन शेतकऱ्यांची दैन्यावस्था व त्याला जबाबदार असलेले घटक शोधून त्यावर कोरडे ओडणारे म. फुले काळाच्याही पुढे असतात. समाजाच्या विकासासाठी त्यामध्ये बदल घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारे म. फुले जातीपातीच्या, धर्माच्या पलीकडे जाऊन माणसाच्या उन्नतीसाठी, त्यांच्या आतल्या समृद्धीसाठी संवेदनशीलतेसाठी झटत होते.

छ. शिवाजीमहाराजांचा सर्वधर्मी जातीपाती विरहित समतावादी दृष्टिकोन पुढे महात्मा फुल्यांनी लोकांमध्ये बिंबवतात. शिवरायांच्या कार्यावरची खरी धूळ फुल्यांनी झटकली आहे. सर्वसामान्य भारतीय समाजाला प्राथमिक शिक्षणाची किती गरज आहे, हे म. फुले दीडशेवर्षांपूर्वी मांडतात. त्याचा पुरस्कार करतात. महात्मा फुलेंच्या या सर्व कार्यात त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या सावित्रीबाई, घडणाऱ्या सावित्रीबाई!

डोळसपणाने म. ज्योतीबांचे कार्य समजून घेऊन त्यातला महत्त्वाचा वाटा उचलणारी, स्वतःला सामाजिक कार्याचं, समाजहिताचं कार्य करण्यासाठी तयार करणारी, दीडशे वर्षांपूर्वी हा निर्णय घेणारी, ज्ञानशलाका समस्त भारतवर्षाच्या स्त्रियांची भाग्यविधाता ठरली. आद्यशिक्षिका, शाळासंस्थापिका, मुख्याध्यापिका सावित्रीबाईंच्या बरोबरीने फातिमा शेख याही शिक्षिका होत्या. त्याही तळमळीने, ध्यासाने सावित्रीबाईंबरोबर काम करत होत्या. समाजामध्ये स्त्री शिक्षणाबद्दल प्रचंड अनास्था, धर्म-रूढी-प्रथापरंपरेचं जोखड, ब्राह्मणी पितृसत्तेची असुरक्षिततेतून आलेली द्वेष भावना, त्यापोटीचा प्रचंडविरोध, त्यातूनच झालेले हल्ले, बदनामी, शेणगोळे व दगडांचा मारा हे सगळं सोसूनसुद्धा निश्चयाने पुढे जाणारी पावले. स्थिरावलेली विचारसरणी जी समताधिष्ठित होती, ती सतत राबवत राहण्यासाठी करावे लागलेले कष्ट, सोसावा लागलेला

अपमान, वाट्याला येणारा द्वेष हे सगळं सोसून सगळ्यांतून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून चालत राहणं यासाठी शिवावरची श्रद्धाचं प्रेरणा देत असेल!

म. ज्योतीबा व सावित्रीबाई फुले यांनी त्यांचा हौद सर्वांसाठी खुला करून पाणी ही निसर्गनिर्मित गोष्ट असून त्यावर सर्व जीवसृष्टीचा अधिकार आहे हे कृतीतून मान्य करत, नैसर्गिक संसाधनावर वर्चस्व गाजवू पाहणाऱ्यांना समतेचा संदेश दिला. म. फुल्यांनी ब्राह्मण विधंवासाठी प्रसुतिगृह काढले. अनाथ मुलाला दत्तक घेतले. अनाथ, अनौरस ब्राह्मण मुलांसाठी अनाथगृह काढले. प्रौढ साक्षरता वर्गही चालवले.

माझ्या लहानपणी जेव्हा म. ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुलेंबद्दल दोनचार ओळीत त्रोटक माहिती सांगीतली जायची किंवा छापून यायची ती वाचून माझा असा समज झाला होता की, केवळ स्त्रियांसाठी शिक्षण व शिक्षणक्षेत्र यापुरतंच महात्मा ज्योतीबा व क्रांतिज्योती सावित्रीबाईंचं कार्य मर्यादित आहे! पण जेव्हा हळूहळू त्यांच्या कार्याची व्याप्ती कळायला लागली तेव्हा लक्षात आले की, बहुजन समाजातली ही दोन माणसं जगातल्या महान क्रांतिकारक विचारवंताच्याही पुढे आहेत.

भारतातील जातव्यवस्था व धर्मव्यवस्था म. फुलेंनी ज्यापद्धतीने मांडलेली आहे, त्यावरचे उपाय व कार्य त्यांनी ज्या जबाबदारीने स्वीकारले होते, त्यांचं ते दृष्टेपण, ती समाजहिताची तळमळ आणि त्याचे आज आपल्याला दिसणारे परिणाम, त्यांच्या सगळ्या चरित्रांचा, त्यांच्या लेखनाचा आपण प्रत्येकाने सखोल अभ्यास करणं फार गरजेचं आहे. म्हणजे समाजातला बाजार व दुकानं आपल्याला नीट कळतील. त्यावर अवलंबून असणाऱ्या दुकानदाऱ्या उघड्या व्हायला लागतील. आजचं सगळं अराजक आपल्या लक्षात येईल आणि आपल्या मार्गात या क्रांतिज्योतीचा प्रकाश सतत मार्गदर्शन करत राहील, आपल्याला प्रेरणा देत राहील.

आज पुन्हा भांडवली व्यवस्थेचे थैमान सुरू झालेले आहे. त्याला तंत्रविज्ञानाची जोड मिळालेली आहे. निव्वळ नफा व पैसा हेच आयुष्याचे ध्येय ठरवणारी जनता, राज्यकर्ते, नेते, सत्तेची हाव असणारे सत्तांध सत्ताधीश आणि मेंढरासारखे समोर दिसेल ते, व दाखवले-सांगितले जाईल तसेच समजणारे लोक स्वतःची बुद्धी, विवेक यांचा वापर न करता, ऐकीव -वाचीव माहितीवर जगणं सोपं करणारी लोक वाढले आहेत. जागतिकीकरणाच्या या काळात एकूण आपण माणसे असुरक्षिततेच्या गर्तेत जगतो आहोत. परंतु त्यातही या सगळ्यात स्त्री अधिक भरडते आहे, हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही.

आज, खूप सावधपणे मार्ग शोधले पाहिजेत. व्यवस्था सगळ्या बाजूने वेष बदलून, भाषा बदलून आपल्याला घेरून बसलेली आहे. परत एकदा स्त्रियांच्या सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. रोज घडणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटना बघताना तुमच्या लक्षात येईल. आजची व्यवस्था स्त्रियांकडे कोणत्या नजरेने बघते? गुन्हे करताना कोणता विश्वास गुन्हेगारांना मदत करतोय? त्यांचं एवढं धाडस कसं काय होतं? माझ्या ऑफिसमध्ये येणाऱ्या स्त्रिया, जेव्हा त्यांच्यावरिल अत्याचाराबद्दल सांगतात. तेव्हा ते ऐकताना त्या माणसांमधला निर्लज्ज, निर्ढावलेपणा, पुरुषसत्तेचा माज, माणूसपणाचा अंत या सगळ्या गोष्टी आपल्या समाजाची पुरुषी मानसिकता दाखवून जाते. ही मानसिकता गोंजारण्याचे कार्य करणाऱ्या यंत्रणा भांडवलशाही नफ्यासाठी पोसत असल्याचे स्पष्ट दिसून येते.

समाधानाची कोणतीही घटना आजूबाजूला घडत नसतानासुद्धा महाराष्ट्रातील स्त्रिया, तरुण मुली आत्मसन्मान व स्वावलंबनासाठी जिद्दीने लढत आहेत. शिक्षणातून मिळालेल्या आत्मविश्वासाने प्राप्त

परिस्थितीला तोंड देत मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. शिक्षण-रोजगार मिळवता मिळवता कुटुंबाच्या भल्यासाठी अहोरात्र कष्ट करत आहेत. या सर्वांतून एक सजग नागरिक म्हणून त्यांच्या मनाचे वैचारिक उन्नयन, घुसळणही होते आहे, या पाउलखुणा अतिशय सकारात्मक आहेत. विविध धार्मिक संघटना-पक्ष वा संस्था या स्त्री शक्तीला स्वत:च्या फायद्यासाठी आपापल्याबाजूने वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. स्त्रियांची बुद्धी, ताकद व स्त्रीत्व या सर्वच गोष्टींवर कशापद्धतीने आपले नियंत्रण ठेवता येईल या प्रयत्नात ते आहेत. त्यासाठी सगळ्या यंत्रणा पद्धतशीरपणे व्यूहरचना आखत आहेत. यात स्त्रियांना स्त्रियांच्या विरोधात उभे करत नायिका व खलनायिका अशा वर्गवाऱ्या करून त्यापद्धतीचे गुण-दोष, आदर्श थोपले जात आहेत. आपल्याच अवती-भवतीच्या व्यक्तींचा आपल्याविरोधी हत्यार म्हणून उपयोग केला जात आहे. सर्वसामान्य स्त्री या नीतीला नकळत बळी पडत आहे आणि हीच स्थिती आम्हाला गंभीर वाटते. यामध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे.

प्रसारमाध्यमे एकीकडे माणसाला ज्ञान-मनोरंजन-कला-संस्कृती-इतिहास इत्यादींची माहिती देतात, पण त्याचबरोबर ही माध्यमे ज्या व्यवस्थेच्या अधीन असतात त्या व्यवस्थेला मान्य असलेल्याच विचारप्रणाल्या प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत असतात. माणसाला त्या नैसर्गिकपद्धतीने घडूच देत नाहीत. त्यांचा प्रभाव गर्भापासूनच सुरू होतो. स्त्री असो वा पुरुष, हळूहळू यांच्या जाळ्यात अलगद अडकते. तेव्हा कष्टाने मिळवलेला आणि पै पै करून साठवलेला पैसा जाहिरातीमागे लागून खोट्या प्रतिष्ठेसाठी, चैनीसाठी उधळायचा नाही. माणूस अनुकरणशील प्राणी आहे. एकाच गोष्टीचा मारा जर सातत्याने करत राहिलो तर तेच खरे ही गोष्ट त्याच्या मनावर बिंबवायला वेळ लागत नाही. पुढे-पुढे त्या गोष्टी अतिरेकाने त्याच्या संवेदनाच बोथट होऊन जातात. जे लक्षात राहायला हवे तोही तो विसरून जातो. इतके प्रचंड गोंधळून जावे की भान सुटावे! असाच हेतू व्यवस्थेच्या व्यवहारामध्ये आहे. निष्क्रीय सुरक्षा यंत्रणेमुळे, षंढ मनुष्यांच्या गर्दीत हरवलेल्या माणुसकीने, माणसांचा बाजार फार स्वस्त झालेला आहे, तसेच घरातील आणि घराबाहेरचे सर्वच वातावरण असुरक्षित झालेलं आहे.

अशा अराजकाच्या काळात, जिजाऊ साहेबांनी शिवबाला हाताशी धरून समतेचं, रयतेचं राज्य आणलं होतं. पुढे क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी तो वसा चालवला. त्यातून प्रेरणा घेत आज आपल्याला परत एकदा कंबर कसून कामाला लागले पाहिजे. सगळ्या अंधाधुंदीची मुळं शोधली पाहिजेत व माजलेल्या ब्राह्मणीपुरुषसत्तेचे हातपाय पुन्हा तोडले पाहिजेत. स्त्रियांनी सुरक्षिततेच्या नकली बेड्या ओळखून स्वतः त्या तोडल्या पाहिजेत. संघटितपणाने एकत्र येऊन सगळ्या क्षेत्रांमध्ये आपला सहभाग वाढवला पाहिजे. यंत्रणेमध्ये कार्यरत असणाऱ्या स्त्रियांच्या सुरक्षिततेचे प्रश्नसुद्धा आपल्यालाच सोडवावे लागणार आहेत. तात्पुरता जोश कामाचा नाही तर, कायमस्वरूपी प्रयत्न करण्याची गरज आहे. पुन्हा १८० वर्षांनी शेतकऱ्यांच्या जमिनी हिसकावण्याचा जागतिक भांडवलदारांचा डाव आहे. कालपर्यंत पर्यायी उद्योगात किमान संधी होती, आज सर्व पर्याय बंद असताना हातचे जमीन, पाणी गमावणे म्हणजे अस्तित्व संपवणे आहे. हे लक्षात घेऊन येणाऱ्या संकटाशी मुकाबला करण्यास सज्ज झालं पाहिजे. त्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाईंची जिद्द व जिजाऊंसारखं मातृत्व परत घराघरांत घडलं पाहिजे.

■

झोत

प्रा. फकरुद्दीन बेन्नूर

# आधुनिक जगापासून पूर्णपणे तुटलेल्या **ग्रामीण महिला**

महाराष्ट्राच्या महिला प्रबोधनाच्या क्षेत्रात पुण्याहून प्रकाशित होणारे 'सगुणा' हे मासिक एक मूलभूत पाऊल आहे. महाराष्ट्र ही प्रबोधन चळवळीची व स्वातंत्र्य चळवळीची राष्ट्रीय जन्मभूमी आहे. महाराष्ट्रातच लोकहितवादींपासून ते महर्षी कर्वे यांच्यापर्यंतच्या सुधारकांनी महिलांचे प्रश्न हाताळले. महिला शिक्षण आणि महिला प्रबोधनाचा पाया घातला. महात्मा फुले हे तर केवळ समाजसुधारकच नसून आमूलाग्र परिवर्तनवादी समाजक्रांतिकारक होते. राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते महर्षी कर्वे-आगरकर यांच्यापर्यंतच्या सुधारकांच्या कार्याचा केंद्रबिंदू हा शहरी उच्चवर्णिय महिलांच्या प्रश्नांभोवती सीमित होता. 'सती'चा प्रश्नही तसे पाहिल्यास उच्चवर्णिय जमीनदारी कुटुंबातील महिलांना पतीनिधनानंतर संपत्तीत किंवा मालमत्तेत वाटा नाकारण्याशी जोडला गेला होता.

गेल ऑमवेट यांनी म्हटल्याप्रमाणे बंगालमधील भद्र लोकांना वाटत होते की, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बायकांप्रमाणे आपल्याही बायका सुशिक्षित असाव्यात. त्या अडाणी आणि मागासलेल्या दिसू नयेत वगैरे वगैरे. महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांनीदेखील तोच दृष्टिकोन ठेवला होता. सती, विधवाविवाह, बालविवाह हे प्रश्न उच्चवर्णीय ब्राम्हणी समाजाचे होते. शूद्रातिशूद्र जातींतल्या स्त्रियांसमोर सतीचा प्रश्न नसला तरी त्यांच्या पुरुषवर्गाप्रमाणे त्या गुलाम आणि पीडितच होत्या.

म. फुले हे असे पहिले क्रांतिकारक होते की, ज्यांनी तळागाळातील पीडित आणि शोषित महिलांचे प्रश्न हाती घेतले. त्यांची निरक्षरता आणि अज्ञान घालवण्यासाठी त्यांच्या शिक्षणाची मोहीम सुरू केली. त्यांनी पहिल्यांदा स्त्री-पुरुष समतेचा मुद्दा मांडला. त्यांच्या प्रबोधनाचा केंद्रबिंदू हा ग्रामीण आणि तळागाळातील शूद्र म्हणजे कष्टकरी, व्यावसायिक, बहुजन जातींतील स्त्रिया आणि अस्पृश्य गणल्या गेलेल्या जातींतील स्त्रिया होत्या. शाळा, सत्यशोधकी मेळावे आदींच्या माध्यमातून त्यांनी सर्वत्र प्रचार केला.

आज म. फुले यांच्या क्रांतिकारक मोहिमेला दीडशे वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. तरीही ग्रामीण आणि बहुजन स्त्रियांचे प्रश्न जसेच्या तसेच आहेत. थोड्याबहुत प्रमाणात त्यांच्यात साक्षरता आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे

दलित स्त्रिया मोठ्याप्रमाणात सवर्णांच्या शोषण आणि गुलामगिरीपासून मुक्त झाल्या आहेत. बहुजन जातींतील स्त्रियांतदेखील शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. शहरी भागातल्या स्त्रिया काही प्रमाणात उच्चशिक्षण घेत असल्या तरी, ग्रामीण भागातील स्त्रियांची मजल शाळा-हायस्कूलपर्यंतच असते. विद्यालयीन शिक्षण फार थोड्या स्त्रिया पूर्ण करू शकतात. समाजातील पुरुष वर्चस्वप्रधान बहुजन जातींतल्या स्त्रियांना अगदी कोवळ्या वयातच लग्नाला सामोरे जावे लागते. वाढा-रांधा आणि नवऱ्याची गुलामगिरी करा. हे त्यांच्या नशिबी येते. सहकार चळवळीतून आणि मुक्त अर्थव्यवस्थेतून पुढे आलेल्या ग्रामीण आणि शहरी धनदांडग्यांच्या गुलामगिरीला आणि टगेगिरीला तोंड द्यावे लागते. ग्रामीण महाराष्ट्रातील बहुजन आणि दलित स्त्रियांचे प्रश्न गंभीर असले तरी, महाराष्ट्रातील तथाकथित स्त्रीवादी किंवा स्त्रीमुक्ती चळवळीच्या पुरस्कर्त्यांचे त्यांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष आहे, असे म्हणता येत नाही.

महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळी नागरी क्षेत्रांपुरतेच मर्यादित राहिल्या आहेत. किंबहुना त्यांनी शहरी विभागातील बहुजन आणि पीडित महिलांचे प्रश्न हाताळले आहेत, असेही म्हणता येत नाही. काही अपवाद सोडल्यास या स्त्रीवादी चळवळीच्या महिला कार्यकर्त्यांचे याबाबतीत आकलनच कमी असल्याचे दिसून येते.

'मिळुन साऱ्या जणी' किंवा तत्सम मासिकांमधून चर्चिले जाणारे प्रश्न पांढरपेशा वर्गापुरतेच मर्यादित राहिले आहेत. तसे पाहिल्यास म. फुले यांच्यानंतर खरी स्त्रीवादी चळवळ उभी राहिलीच नाही. आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे आणि महिलांच्या प्रश्नांनी आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. शहरांतील रस्त्यापासून ते बसगाड्या, रेल्वे, कार्यालयातील जागा वगैरे ठिकाणी महिलांवर अतिप्रसंग केले जात आहेत. बलात्कार आणि हुंडाबळी यांत प्रचंड मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत.

राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, नेते, मंत्री, ऑफिसातील आणि सैन्यातील अधिकारी हे मोकाट सुटले आहेत. न्यायालयांतील अनेक निर्णय महिलांच्या विरोधात जाणारे आहेत. शहरातील पांढरपेशा महिलांकडेच जेथे दुर्लक्ष होत आहे, तेथे ग्रामीण भागातल्या महिलांचा कोण विचार करणार?

ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांचे प्रश्न फार गंभीर स्वरूपाचे आहेत. किंबहुना त्या जगतात कशा? त्यांची मुस्कटदाबी कशी होते? याकडे कुणाचे लक्ष आहे, असे म्हणता येत नाही. पुण्याच्या परिसरात लहान गावे आणि वस्त्या आहेत, किंबहुना ती सर्व ठिकाणे पुणे शहराचा भाग आहेत. तरीसुद्धा तेथील शाळेत मुली, महिलांवर होणारे अत्याचार, दडपण याची किंचितही जाणीव पांढरपेशा समाजाला नाही.

त्या परिसरात जे बिअरबार किंवा तथाकथित टुरिस्टांसाठी जी लॉजेस आहेत त्याचे भयंकर दडपण ग्रामीण महिलांवर असल्याचे दिसून येईल. आपल्या मुलीचे काही खरे नाही, तिचे काहीही होऊ शकते म्हणून घरची मंडळी लहान वयातच तिचे लग्न करून मोकळे होतात.

या भागातल्या कुटुंबांना आपल्या मुली गावगुंडाच्या तावडीतून कसे सुरक्षित ठेवावे, हा गंभीर प्रश्न आहे. परिणामी सातवी, आठवीपर्यंत शिक्षण झाले की, मुलींना घरी बसवले जाते. त्यांच्या आयुष्यात अंधार पसरतो. त्यांचा बाहेरच्या जगाशी संपर्क तुटलेलाच राहतो. या मुली आणि महिला आधुनिकतेपासून पूर्णपणे तुटलेल्या राहतात. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातदेखील अशीच परिस्थिती

आहे.

गावागावांत गुंडगिरी वाढली आहे. बेकारी, टगेगिरी आणि राजकारण्यांनी लादलेली व्यसने, या गोष्टी ग्रामीण तरुणांत वाढल्या आहेत. महाराष्ट्रातील अनेक गावे अशी आहेत की, जिथे आजही शिक्षणाची काही व्यवस्था नाही. प्राथमिक शाळा नावालाच आहेत. मुलगी चौथी-पाचवीपर्यंत शिकली की, तिला घर कामाला जुंपले जाते. तिचे लग्न उरकायच्या तयारीला पालक लागतात. गावातल्या बहुसंख्य महिलांना नाममात्रच अक्षर ओळख असते. या स्त्रिया दिवसभर घरात कोंडलेल्या किंवा शेतात अडकून पडतात. नवीन कार्पोरेट अर्थव्यवस्थेमुळे आणि दुष्काळामुळे शेती व्यवसायाचेही दिवाळे निघालेले आहेत. त्यामुळे ग्रामीण पुरुष बेकार तरी आहेत किंवा राजकारण्यांच्या मागे लागलेले आहेत.

ही गावे २१ व्या शतकात आहेत यावर विश्वास बसत नाही. महिलांच्या शिक्षणाची व्यवस्था नाही, त्यांच्या आरोग्याची काळजी नाही. अशात आपल्या बापाच्या, भावाच्या किंवा नवऱ्याच्या दडपणाखाली जीव मुठीत घेऊन जगावे लागते.

ग्रामीण भागात मासिके, वर्तमानपत्रे अभावानेच असतात. महिलांना त्यांचा स्पर्शही होत नाही. जगात काय चाललेले आहे? जिल्ह्याच्या ठिकाणी काय घडत आहे? हे त्यांना माहीत होण्याचे कोणतेही माध्यम नसते. रेडिओ किंवा टीव्हीदेखील फारसे उपलब्ध नसतात. जेथे आहेत ते पुरुषांच्या ताब्यात असतात. इंटरनेटसारख्या माध्यमांची त्यांना कल्पनाही नसते.

ग्रामीण भागातील महिला २१व्या शतकातील आधुनिक जगापासून पूर्णपणे तुटलेल्या आहेत. एखादी-दुसरी मुलगी शहरापर्यंत किंवा तालुक्यासारख्या गावी पोहोचू शकते. हा २१ व्या शतकातला ग्रामीण भारत आहे. महात्मा फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अशी स्थिती आहे, तेव्हा उत्तरप्रदेश, बिहारमध्ये काय परिस्थिती असेल? याची कल्पनाच न केलेली बरी.

वास्तविक ग्रामीण महिलांना घरगुती व्यवसाय, शिवणकाम, विणकाम, घरगुती पदार्थांच्या उत्पादनाचे प्रशिक्षण दिल्यास त्या स्वावलंबी होऊ शकतात. घरातील आर्थिक परिस्थितीत ही सुधारणा होऊ शकते. परंतु अशी कोणतीही सोय किंवा सुविधा ग्रामीण भागात नसते. स्त्रीमुक्ती चळवळीचे, पांढरपेशा महिलांच्या समाजकारण आणि राजकारणाशी ग्रामीण महिलांचा कसलाही संबंध नाही. एकतर ग्रामीण महिलांपर्यंत त्यांची नियतकालिके पोहोचतच नाहीत. दुसरे म्हणजे पांढरपेशा उच्चवर्णिय आधुनिक महिलांच्या प्रश्नांचा आणि ग्रामीण भागातील महिलांच्या प्रश्नांचा सुतराम संबंध नाही.

ही परिस्थिती लक्षात घेऊन ग्रामीण भागात काम करणाऱ्या सगुणा संघटनेने ग्रामीण महिलांच्या प्रश्नांना वाहून घेतलेले 'सगुणा' हे मासिक सुरू केले आहे. 'सगुणा'च्या कार्यकर्त्या हे मासिक गावागावांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'सगुणा'तर्फे केवळ औपचारिक शिक्षणाची मोहीम चालवली जात नाही, तर शिवणकाम, रेडिमेड ड्रेस तयार करणे, घरगुती वस्तू तयार करणे, याचेही प्रशिक्षण सुरू केले आहे. तसेच 'सगुणा' मासिकात लिहिणाऱ्या मुली आणि महिला ग्रामीण भागातल्याच आहेत. त्यांच्या प्रश्नांची त्यांच्या परिभाषेत चर्चा करीत आहेत. तेव्हा महाराष्ट्रातील महिला प्रबोधनाला नव्याने सुरुवात 'सगुणा'ने केली आहे. त्यांस शुभेच्छा!

■

प्रा. फकरुद्दीन बेन्नूर
जेष्ट विचारवंत, सोलापूर.
मो. ९८२२८०७५०६

शोध बोध

सौ. शोभा करांडे

# तारतम्य हवे

पेपरमध्ये छापून येणारी व दूरचित्रवाणीवरून (टीव्ही) दिसणारी प्रत्येक गोष्ट खरीच असते, असे मानणाऱ्या अनेक व्यक्ती आपल्या आजूबाजूला आहेत. आमच्या नीतासमोर प्रसारमाध्यमे म्हणजे काय? असा प्रश्न आहे. उमा, गायत्री, साक्षीला माध्यमांमध्ये दाखवल्या जाणाऱ्या, लिहिल्या जाणाऱ्या सर्वच गोष्टी सत्यच असतात असे वाटते. त्या काल्पनिक व खोट्या असू शकतील अशी पुसटशी शंकाही तिच्या मनाला शिवत नाही. या मुली प्रसारमाध्यमातून पाझरणाऱ्या 'ज्ञाना'ला कशापद्धतीने घेत असतील, हे पाहणे आवश्यक आहे. तसेच माध्यमांचे नेमके हेतू ओळखून ते सर्वसामान्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे?

आदिम काळापासून प्रचलित असणारी माध्यमांची साधने तपासणे जिकिरीचे असले तरी फार अवघडही नाही. शब्द-भाषा या अगोदरसुद्धा माणूस एक-दुसऱ्याला संदेश, संकेत पोहोचवत होताच. वेगवेगळी प्रतीके, चित्रे यांमधून तो प्रसारित होत होता. लिखित साहित्यसंस्कृतीच्या निर्मितीच्या आधी प्रचलीत असणारी मौखिक परंपरा, लोकसंगीत आदींच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन व प्रबोधन करत असे. संगीत-चित्रकला-धातुकला-शिल्पकला यांमधून मानवाचे जीवनाबद्दलचे आकलन व अपेक्षा तसेच व्यक्त होण्याचेही प्रयत्न दिसून येतात.

मानवी विकासात भाषा हे संपर्काचे प्रमुख व महत्त्वपूर्ण माध्यम ठरले. भाषेच्या प्रगतीबरोबरच लोकांचा एकमेकांशी संवाद व संपर्क साधण्यासाठी माध्यमांचा वापर होऊ लागला. भक्तिमार्गातून येणारी भजने, प्रवचने, दोहे या माध्यमांतून जनतेचे प्रबोधन व मनोरंजनही होत असे. लोककलांमधून येणारे तमाशे, नाटके, शाहिरी हेही माध्यमे आहेत. तत्कालीन सामाजिक समजुती व गरजांप्रमाणे ही माध्यमे विकसित होत गेली. त्यांनी त्या-त्या वेळेला समाजाच्या जडणघडणींमध्ये योगदान दिले.

विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच घडत गेलेली मानवी प्रगती पाहता माध्यमांतील बदलही आपणास पाहावे लागतील. स्वतःला व्यक्त करण्यासाठी कला-संगीत-साहित्य या माध्यमांबरोबरच चित्रपटांचाही उदय झाला. सुरुवातीस मूकपट, कृष्णधवल व पुढे बोलके रंगीत सिनेमा समाजमनावर प्रचंड प्रभाव टाकू लागले.

पुराणांपासून-वेदांपासून महाकाव्याचा समाजमनावरचा संस्कार अभ्यासतानाच या

निर्मितीमधले त्या काळाच्या समाजाचे प्रतिबिंब व उपाययोजना तपासल्या पाहिजेत. भारतीय समाजाच्या जडणघडणीमध्ये व संस्कारामध्ये या माध्यमाचा असणारा प्रभाव खूपच व्यापक व गंभीर आहे. यांचा वापर नेमका कुठल्या वर्गाकडून झाला? त्याची मक्तेदारी कोणाकडे होती? त्यातून नेमक्या कोणत्या गोष्टी बिंबवल्या गेल्या? समाजातल्या कोणत्या वर्गाचे हितसंबंध यांतून जोपासले गेले? यावरून या माध्यमांचा नेमका वापर कशासाठी करून घेतला जातो? हे अभ्यासता येते. समाजातल्या विषमतेची पाळेमुळे शोधायला आपल्याला याची मदत होईल. साहित्याच्या प्रांतातली या पुढची वाटचाल बुद्धाच्या जातककथा, इसापनीती, पंचतंत्र या माध्यमातून समाजाला काही संदेश देता-देताच त्याला काही युक्ती-हिताच्या गोष्टीही शिकवण्याचा प्रयत्न होता.

पाचशे वर्षांपूर्वी छपाई यंत्राचा शोध लागला असला तरी एकोणिसाव्या शतकात खऱ्या अर्थाने मुद्रित माध्यमांना सुरुवात झाली. दीड-दोनशे वर्षांपूर्वी मराठी मुद्रित साहित्याची निर्मिती झाली. यानंतर माध्यम म्हणून लेखणीचा वापर सुरू झाला. अनेक कादंबऱ्या-कविता-वैचारिक-ललित, ऐतिहासिक लेखन असे विविध वाङ्मयप्रकारांची पुस्तके या साऱ्यांच्या विचार-प्रभावातून घडत चाललेली संस्कृती कोणती मूल्ये रुजवत होती? या सर्व लेखन व्यवहारामध्ये कोणता वर्ग आघाडीवर होता? त्यांच्या लेखनामधून कोणत्या समाजाचे जीवन-विचार वा चित्रण व्यक्त झालेले आहे? या माध्यमांच्या प्रभावाखाली शिक्षित झालेली बहुजनांची पहिली पिढी आपल्या डोक्यात बाहेरचे काय-काय भरू लागली? आधुनिकता, श्रमाला व श्रमिकांना, कुणबी व कुणबीकीला, उत्पादक व उत्पादन व्यवस्थेला कशा पद्धतीने आव्हान देऊ लागली? या सर्वांचा शोध आणि बोध पाहताना यातील माध्यमांची भूमिकाही तपासणे गरजेचे आहे. पत्रकारिता वा वर्तमानपत्रांचे युगही याच दरम्यान सुरू झाले. शिक्षित माणसाला जगातल्या घडामोडी बसल्या ठिकाणी कळायला लागल्या. रोजच्या बातम्या, विचार प्रवर्तक मजकूर, अनेक घडामोडी नित्य लोकांपर्यंत पोहोचू लागल्या. चर्चा, परिसंवाद, भाषणे यामधून समाजाची मानसिकता त्याचा कल कळू लागला. भाषा, भाषणे ही माध्यमे प्रभावशाली ठरतात, आपले विचार-मूल्य-रीत-पद्धत स्वीकारायला-नाकारायला माध्यमे आपल्याला मदत करतात, आदी क्रिया-प्रतिक्रियांमधून या माध्यमांनाही त्यांची ताकद कळू लागली.

वर्तमानपत्रांबरोबरच साप्ताहिके, मासिके यांचाही समाज उभारणीसाठी, ज्ञान व मनोरंजनासाठी उपयोग होतो. काही वर्षांपूर्वी टीव्हीचा वापर नव्हता, तेव्हा दुपारच्या वेळात मध्यमवर्गीय गृहिणी वामकुक्षीबरोबर एखादे मासिक, साप्ताहिक जरूर वाचायच्या. कथा-कविता यांच्याही माध्यमातून हळवी, संवेदनशील सु-संस्कृतता कधी, तर कधी प्रेरक आवेशपूर्ण शैलीतील धगधगती स्फुर्तीगीते, गोड बालगीते या सर्व माध्यमांचा वापर सर्वदूर परिचित झाला.

शंभर वर्षांपूर्वी सिनेमाचा शोध लागला आणि माध्यमांचे जग वेगळ्याच संकेतांना साक्षी होऊ लागले. सुरुवातीचे मूक -कृष्णधवल, मनोरंजकपद्धतीचे सिनेमे हळूहळू बदलत जाऊन रंगीत व बोलके याबरोबरच कलात्मकपद्धतीचे सिनेमे येऊ लागले. कथा एक भाग झाली व बाकीचे सारे दिग्दर्शकाचे क्षेत्र समजले जाऊ लागले. यातून राष्ट्रप्रेम, काही सामाजिक आशय असणारे, समाज परिवर्तनाच्या कार्याला हातभार लावणारे, संदेश असणारे सिनेमे एकीकडे तर पारंपरिक विचारधारा, रीती संकल्पना जोपासणारे कथानक हाताळत नृत्य-

संगीत- हाणामाऱ्या, मेलोड्रामा यांच्या मदतीने मनोरंजनाचा मसाला भरलेले सिनेमेही प्रचंड संख्येने तयार होऊ लागले. प्रेक्षकांची नस ओळखून त्यांना गुंगवत तीन तास वेगळ्याच विषयात घेऊन जाऊ लागले. सिनेमाचेही काही प्रकार तयार होऊ लागले. शिक्षित-सुशिक्षित, शहरी लोकांसाठी तयार होणारे कलात्मक सिनेमे गंभीर, वैचारिक, अभिजात साहित्यावर आधारित असणारे व त्या त्या वर्गाला भावणारे-समजणारे सिनेमे; तर पीटातल्या प्रेक्षकांसाठी मसाला, गल्लाभरू-अश्लिल सिनेमे, अशाप्रकारची वर्गवारी काही वर्षे चालू राहिली. सिनेमा समाजाच्या मनोरंजनाचा-प्रेरणेचा-देशभक्ती-मातृप्रेम-धर्म-संस्कृतीची झालर दाखवत-दाखवतच, अंगप्रदर्शन-हिंसाचार-व्यसनांचे उदात्तीकरण, मनोव्यापाराच्या वेगवेगळ्या अवस्थांवर गृहितक बनवू लागला. उदास-आनंदी, अपेक्षापूर्ती-अपेक्षाभंग यापद्धतीच्या मानसिक अवस्थांचे चित्रण सिनेमा ज्यापद्धतीने करेल, त्यापद्धतीने समाजमन विचार करू लागले. समाजाचे चित्रण ज्यापद्धतीने सिनेमांमध्ये होऊ लागले त्याचपद्धतीने समाजामध्ये सिनेमा दिसू लागला. लोकांच्या जगण्याच्या-वागण्याबोलण्याच्या-पेहराव-वेशभुषा-केशभुषा या सगळ्यांवर सिनेमाचा प्रभाव दिसू लागला. मनोरंजनाबरोबरच सिनेमाचा प्रभाव समाजाच्या प्रत्येक चौकटीवर पडू लागला. सिनेमा विचारामध्ये जाऊन बसला. पडद्यावर अभिनय करणारे अभिनेत्री-अभिनेते समाजाचे आदर्श होऊ लागले. सिनेमासृष्टीचे प्रचंड जग आर्थिक उलाढाली घडवू लागल्या.

जागतिकीकरणानंतर या माध्यमाच्या सादरीकरणामध्ये प्रचंड बदल घडून आला. लोकांच्या मनोरंजनासाठी, प्रबोधनासाठी वापरली जाणारी माध्यमे भांडवलशाहीने स्वतःच्या फायद्यांसाठी वापरायला सुरुवात केली. सिनेमामध्ये अनेक नव्या गोष्टी घुसल्या. सिनेमा माध्यम हे त्यातल्या त्यात दर्दी असणाऱ्या तज्ज्ञ माणसांच्या हातांतून, पैसा गुंतवू शकणाऱ्या भाडंवलदारांच्या हातात गेली. गुतंवलेला पैसा वसूल करणाऱ्या कलाकृती निर्माण होऊ लागल्या. हळूहळू या व्यवस्थेच्या धोरणाला मदत करणारे व त्यापद्धतीचे समाजमन तयार करणाऱ्या सिनेमांची संख्या वाढीस लागली. मूल्यांचा ऱ्हास करून माणसाला वस्तू स्वरूपात मोजणाऱ्या व्यवस्थेला प्रत्यक्षरूपात दाखवणारे सिनेमे निर्माण झाली. याच्या जोडीला जाहिरातीचे जगही उभे राहू लागले. जे भाडंवली जगातले उत्पादन लोकांना खरेदी करायला भाग पाडते, लोकांना उद्यूक्त केले जाते. जेथे खोट्या गरजा निर्माण करून लोकांना पैसा खर्च करायला लावले जाते. अतिशय चकचकीत, आर्कषक, समाजमनाचा नेमका ठाव घेणाऱ्या, हव्या-नको त्या सगळ्याच गोष्टी वापरायला भाग पाडणाऱ्या जाहिराती दाखवल्या जातात. जाहिराती दृक् श्राव्य व चित्रसदृश माध्यमातून सगळीकडून माणसांवर बाजार कोसळत आहे. खाणे, कपडे, पादत्राणे, दागिणे, सौंदर्यप्रसाधने, इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू, घरात वापरायच्या वस्तू, वेग-वेगळ्या व्याधींवरची औषधे-उपचार, माणसाला लागणाऱ्या व न लागणाऱ्या सर्व गोष्टींची गरज, लालसा, हाव निर्माण करण्याचे कसब या तंत्रात ठासून भरलेले आहे. आज चित्र असे दिसतेय की, अनेक क्षेत्रांत रोजगार आहे. पैसे आहेत पण ते काढून घेण्याचेही अनेक मार्ग भाडंवली व्यवस्थेने करून ठेवलेले आहेत.

जमीन व्यवसाय, जागा विकून आलेल्या पैशातून नवीन गाड्या, चैनीच्या वस्तू, रोज बाजारात येणारे मोबाईल्स, लॅपटॉप्स, वेगवेगळे गेम्स या सगळ्या वस्तू नियमित बाजारात नवीन स्वरूपात अवतरीत होत आहेत. मुलं-प्रौढ-वयस्क सर्वच जण या चक्रात फिरत आहेत. जास्तीत जास्त धन कमावणे व ते

यावर उडवणे अशी चंगळवादी जीवनपद्धती प्रचलीत झालेली आहे. विशेष म्हणजे याकडे प्रतिष्ठेची बाब म्हणून पाहिले जाते. या प्रकारच्या जन-मानसिकतेचा अभ्यास करूनच ही बाजारू व्यवस्था लोकांना नव-नवीन आर्कषणात, आमिषांत अडकवून ठेवते. आपण खूप सावधपणे या बाबींकडे पाहिले पाहिजे.

गरजेच्या गोष्टींना जाहिरातीची गरज नसतेच. अनावश्यक गोष्टीच आपल्या माथी मारण्यासाठी वेग-वेगळ्यापद्धतीने आपल्या समोर मांडल्या जातात. या चक्रव्यूहात न अडकता आपण आपल्या गरजा व आवड नीट समजून घेऊन त्यातला अनावश्यक तो फापटपसारा काढून आपल्या गरजा जितक्या मर्यादित ठेऊ तितका पैशाचा अपव्यय कमी होईल व आपला त्रासही वाचेल.

सिनेमाचे जग विस्तारत असताना टीव्ही घरात आला. सुरुवातीला तास-दोन तास चालणारा टीव्ही हळूहळू चोवीस तास चमकू लागला. त्याचाही प्रवाह अस्सल-अभिजाततेकडून निव्वळ धंदा इथपर्यंत पोहोचला. यामध्ये खूप माहिती, ज्ञान व मनोरंजन असे न होता प्रथम मनोरंजन, माहिती-ज्ञान असे घडत गेले. बातम्या देणारे चॅनल्ससुद्धा सनसनाटी, मनोरंजन व प्रेक्षकांना आपल्याच चॅनलवर खिळवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कसरतींमध्ये व्यस्त झाले. टीआरपीसाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा आणि त्यात सनसनाटी निर्माण करण्यासाठी धावपळ हेच मुख्य उद्देश ठरून गेले. यामधून लोकांपर्यंत पोहोचणारे संदेश कसे आहेत? त्यात कितपत गांभीर्य असते? डोक्यात काय गेले? हे तपासायला लागेल. सतत त्याच त्या गोष्टी ऐकवून आणि दाखवून मनावर त्याचे काय परिणाम होत आहेत? याकडे कोणाचेही लक्ष नाही.

हळूहळू संवेदनाच बोथट होऊन जात आहेत. गुन्हेगारीवर आधारित कार्यक्रम वा मालिकाही खूप दाखवल्या जात आहेत. खून, बलात्कार, अपहरण, देशद्रोह आदींसारखे गुन्हे कशा पद्धतीने घडतात आणि त्यापासून कसे सावध राहायला हवे, हे दाखवतानाच गुन्हे कसे करायचे, त्याच्या कोणत्या पद्धती वापरात असतात; तसेच अन्याय-अत्याचाराविरोधात दाखवल्या जाणाऱ्या मालिकांमध्ये अन्याय व अत्याचार कसे करायचे, हे सर्व बरेचसे 'कळत' नकळत मनोरंजनाच्या नावाखाली नाट्यात्मकरीतीने दाखवले जाते. चॅनेल्सना टीआरपी मिळतो व लोकांचे मनोरंजन होते, हा वरवर दिसणारा परिणाम सोडल्यास याचे समाजमनावर दूरगामी परिणाम होतात. लहान वयातली मुले, पौगंडावस्थेतली मुले, तरुण, प्रौढ, वयस्क म्हातारी माणसे अशी सगळ्याच वयोगटांतील माणसांवर याचा अतिशय वाईट परिणाम होतो. पण यावर कोणाचेही नियंत्रण नाही. केवळ मूठभरांना पैसे-धंदा व प्रसिद्धी मिळते, बस्स!

जाहिरातीत होणारा माणसांच्या शरीराचा वस्तुरूपातला वापर कसा टाळता येईल? याचाही विचार व्हायला हवा. याला विरोध व्हायला हवा. टीव्ही किती वेळ पाहायला पाहिजे? काय पाहिले

**गरजेच्या गोष्टींना जाहिरातीची गरज नसतेच. अनावश्यक गोष्टीच आपल्या माथी मारण्यासाठी वेग-वेगळ्यापद्धतीने आपल्या समोर मांडल्या जातात. या चक्रव्यूहात न अडकता आपण आपल्या गरजा व आवड नीट समजून घेऊन त्यातला अनावश्यक तो फापटपसारा काढून आपल्या गरजा जितक्या मर्यादित ठेऊ तितका पैशाचा अपव्यय कमी होईल.**

■

पाहिजे? हा प्रत्येकाचा स्वतंत्र मुद्दा असला तरी त्याचे तारतम्य जरूर हवे. महत्त्वाचे, गरजेचे, उच्चदर्जाच्या अभिरुचीचे संवर्धन करणारे, लोकपरंपरा, कृषिपरंपरा यांविषयी आस्था असणाऱ्या कार्यक्रमांतून मनोरंजनाबरोबर ज्ञानही मिळते.

कलाप्रसूती, गुणग्राहकता, कौतुक हेही महत्त्वाचे असते. मात्र त्यातून योग्य ते संदेश पोहोचले पाहिजेत. बघणाऱ्याच्या मनात प्रेरणा, आत्मविश्वास निर्माण होणे गरजेचे आहे. मार्गदर्शन हे सकारात्मकता वाढीला कारणीभूत ठरणारे असावे. बैठी, आळशी, निष्क्रीय, नुसती टीका करणारी समाज-मानसिकता रोगट असते. दहशत, भितीचे वातावरण निर्माण करणे माध्यमांनी टाळायलाच हवे. समता-स्वातंत्र्य-बंधुता ही मूल्ये माध्यमांकडूनही राबवली गेली पाहिजेत.

इंटरनेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल्स, स्मार्टफोन हे तर आता तळहातात आले आहेत. हवी असलेली माहिती एका सेकंदात मोबाईलधारकाला मिळू शकते. कसल्याही प्रकारचे दळणवळण आता शक्य झालेलं आहे. जगातली सगळी माहिती आपल्या हातात! सगळ्या प्रश्नांची उत्तरे तयार! कशाबद्दलचीही उत्सुकता शिल्लक ठेवायची गरजच नाही. कल्पना राजाला तर रामरामच! महत्त्वाच्या कामासाठी, माहितीसाठी, बातम्यांसाठी, बाजारातल्या सगळ्या घडामोडींसाठी ही साधणं खूपच उपयोगी पडतात. ज्याला ज्यापद्धतीचे काम आहे, त्यापद्धतीचे फोन कनेक्शन मिळू शकतात. काम सोपे झालेले आहे. खूप धडपड वाचलेली आहे. कुठलेही संदेश, संभाषण-दर्शन पाहिजे तिथे पाहिजे तेव्हा होऊ शकते. सतत चाललेले मोबाईल्स संवाद, सेवा अहोरात्र चालू आहेत. जगणे खूप सोपे व्हायला हवे? पण तसे होत आहे का?

आपल्याला नेमके व नक्की काय हवे? हे ठरवता येणे मुळात फार गरजेचे आहे. ते जमले की या सगळ्या गोष्टी आपण कशा वापरणार ते ठरवता येईल. नाहीतर सतत सगळीच माहिती असते, पण वेळेवर एकही गोष्ट पक्की आठवत नाही. सगळ्यांशीच रोज गप्पा, चर्चा चाललेल्या असतात, पण एकही जवळचा माणूस जो आपल्या सुखदुःखात-आनंदात सहभागी होऊ शकेल असा असत नाही. याचाही विचार करायला लागेल. आयत्या वेळेला या सेवा जर पोहोचल्या नाहीत तर डोके काम करते का? हे तपासायला हवे.

गावामध्ये, खेड्यामध्ये जेव्हा कधी या सेवा बंद पडतात त्या परिस्थितीत सेवाधारक कसे व्यवहार करतात, तेही बघणे महत्त्वाचे आहे. सतत या सेवांवर अवलंबून असणारे सेवाधारक, प्रतिकूल परिस्थितीत -आणीबाणीत गोंधळून असाहाय्य झालेले वाटतात. मेंदूचा वापर सर्वांगीण पद्धतीने करण्याची सवय जर नसेल तर आयत्या वेळेला गडबड होत राहते. म्हणून या सर्व व्यवहारामध्ये तारतम्य हवे. शेवटी सगळी साधने, माध्यमे ही माणसांच्या सोयीसाठी बनलेली आहेत. आपण त्याचा वापर हा विचारपूर्वकच करायला हवा. आपले योग्य नियंत्रणच या सगळ्या व्यवस्थांना विचार करायला भाग पाडेल आणि तेच आज गरजेचे आहे.

■


**सगुणा**

सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट,२०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजच्या पाठीमागे, पुणे. ४११ ०३० दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५,

परामर्श १

प्रा. नुतन माळवी

# पुरुषांना आता मानव बनण्याची गरज येऊन ठेपली आहे

दिल्लीत गेल्या आठवड्यात धावत्या बसमध्ये एका तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्काराने सारा देश हादरून निघाला. ते कृत्यही तसेच लाजिरवाणे आहे. त्याचा संसदेत, वर्तमानपत्रात, टीव्हीवर, गावागावांत सामान्य महिलांनी कँडल मोर्चा काढून, शासनाला निवेदन देऊन निषेध केला. सर्वत्र बलात्काऱ्यांना फाशीची शिक्षा ताबडतोब द्या असा, राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा सूर दिसून येतो. सर्वत्र संताप, वेदना, भीती आणि जळजळता क्रोध प्रकट होतोय, जे स्वाभाविक आहे. तो झालाच पाहिजे. याची गरजदेखील आहे. तरुणाईच्या या विरोधाचा जोश पाहून कौतुक करत आहेत.

पण हे सर्व दिल्लीतील त्या 'निर्भया' (Times Of India, 23-12-12, हे नाव ठेवले आहे) किंवा 'दामिनी' ह्या २३ वर्षीय मुलीने स्वत: जोरदारपणे या प्रवृत्तीच्या विरुद्ध उभे टाकण्याच्या भूमिकेमुळे हे घडून आले आहे, तिच्या पुरुष मित्राने तिला साथ दिली आणि हे प्रकरण उभे टाकले. प्रचार प्रसारमाध्यमांनी उचलून धरले व साऱ्या देशात स्त्री-अत्याचारांवर चर्चा सुरू झाली. या सर्व गोष्टींचा सारासार विचार केल्यानंतर एक बाब प्रकर्षाने जाणवते, की ही 'निर्भया' वा 'दामिनी' उच्चवर्गातील, विद्याविभुषित आणि दिल्लीसारख्या भारताच्या राजधानीच्या शहरातील मुलगी आहे. तिचा पुरुष मित्र ही चांगल्या विचारांचा, हिंमतवाला दिसतो म्हणून तिला साथ देतोय. पण हे सारं आमच्या भारतातील गावखेड्यांतील मुलीच्या बाबतीत घडले असते तर? म्हणजे एक लक्षात घ्या की, हे नराधमानं केलेले कृत्य कोणाबाबतीतच घडू नये असे मला प्रामाणिकपणे वाटते. पण या देशातील किती 'निर्भया' ज्या सतत सामूहिकतेने अपमानित, विनयभंग बलात्कारित होत आहेत, त्याचा विचार सर्व प्रचार प्रसारमाध्यमे एवढ्या जोरकसपणे करतात? त्या कुठे एका कोपऱ्यात कोणत्या तरी हॉस्पीटलच्या एका कोपऱ्यात लैंगिक शोषणाची बळी म्हणून कधी आसवं गाळता गाळता आपण न केलेल्या गुन्ह्याची भयंकर किंमत मोजत, ह्या समाजाच्या उपेक्षेची, टिंगलीची गुदमरलेपणाची शिकार बनतात व एक दिवस कोणताच डॉक्टर तिचे 'हेल्थ बुलेटिन' (Health Bulletin) प्रसिद्ध न करता एखाद्या सरकारी रुग्णालयातील खाटेवरला असाह्यपणे जीव सोडते. आई-वडील, नातेवाईक, समाज मेली म्हणून 'बरे

झाले पोरीचे' म्हणून हळहळत राहतात.

समाजात, ह्या देशात बलात्कारी मुलीचे काय जीवन आहे ? दिल्लीची असली, मुंबईची असली तर थोडं फार बाहेर येते, पण खेडेगावातील किंवा प्रियंका भोतमांगे सारखे दलित मुलीचेही असेच स्त्री म्हणून होणारे शोषण विचारात घ्यायला हवे होते. असे या प्रसंगी प्रकर्षाने वाटते. बलात्काऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, ही मागणी सर्वत्र दिसते, पण हे फार सोपे गणित वाटते. बलात्काऱ्यांना मारून टाकून हा प्रश्न तात्पुरता निकाली निघेल एक वेळेस, पण संपूर्ण स्त्रीसमाजाच्या सन्मानाचा त्यात विचार नसेल. बलात्काराचा प्रश्न हा ह्या देशातील पुरुषप्रधान व्यवस्थेशी - ब्राह्मणी मानसिकतेच्या विषारी पुरुषी वृत्तीषी निगडित आहे. दिल्लीच्या त्या तरुणांच्या संपूर्ण जोशाला बारकाईने पाहिले तर काही प्रश्न उभे राहिलेले दिसतात. ते सारे महिलांच्या सन्मानाचा प्रश्न म्हणून उभे राहिले आहेत का? एक इंडिया गेटच्या गर्दीतला मुलगा एका स्त्रीला तिथेही धक्के मारत होता, तेव्हा तिने आवाज उठवला तर तो तिच्याशी उद्दामपणे बोलत म्हणाला, 'मी स्त्रीच्या सन्मानासाठी वगैरे नाही आलो तर माझ्या बहिणीसाठी आलो फक्त, इथल्या साऱ्यांचे मला काय करायचे?'

महिलांचा प्रश्न म्हणून ते एकत्र आले असते तर त्याच्या घोषणा 'बलात्काऱ्यांना बांगड्या घाला' ह्या नसत्या ! कारण बांगड्या घालणारे हात कमजोर असतात, मग ते काय पराक्रम करतील? ते तर अबला स्त्रियांचे हात ना! आता मग ज्या स्त्रिया बांगड्या घालतात, त्या कमजोर, त्याचे सारे अबलापण शाबूत ठेवून, मनात ठेवून जर तरुण मुले-मुली तिथे बलात्काऱ्यांना बांगड्या घाला म्हणत असतील तर स्त्री सन्मानाची कोणती भूमिका त्यांच्याकडे आहे? हा बलात्कार म्हणजे हा त्या सहा बलात्काऱ्यांपुरती मर्यादित घटना आहे का? हा तर स्त्रिच्या शरीराला, तिच्या अस्तित्वाला काहीच सन्मान न देता तिला वाटेल तेव्हा वाटेल तसे भोगणे, वापरणे व नंतर फेकून देणे, ही अत्यंत अपमानास्पद वागणूक त्यामागील तिला तुच्छ स्त्री म्हणणे, केवळ शरीर (देह) मानणारी पुरुषी वर्चस्वाची प्रवृत्ती ही येथे ठेचायची आहे. ती अबला आहे - हा भाव येथे नष्ट करणे महत्त्वाचे आहे. मग बलात्काऱ्यांना केवळ शिक्षा न करता व बलात्कार करण्याची हिमंत करण्यास कोणीही धजावनार नाही, अशी वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. स्त्री ही खेळणं नाही - तिच्या भावभावनांचा, शरीराचा हैदोस माजवणे हे थांबवणे- यासाठी हे गरजेचे आहे. आणि त्यात मग Rape the rapiest असेही ओरडणारेही चुकीचेच ठरतात. 'आमच्यावर बलात्कार झाला तर तुमच्यावरही आम्ही तोच बदला घेवू' हा काय न्याय आहे? याने कोणता प्रश्न सुटणार आहे. फाशी देऊन वा परत बलात्कार करून! म्हणजे जीव घेऊन विचारांच्या संकुचितपणाचा विकासच होणार, विचारांच्या कक्षा रुंदावणार नाहीत; त्यात उदात्तता येणार नाही. स्त्रीला प्रथमपासून या देशात अतिशूद्र ह्या वर्णात ठेवले आहेत. 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हती' असे मनुवाक्य आहे, म्हणजे स्त्री ही स्वातंत्र्याच्या लायकीचीच नाही. मग परत अशा घटनांमुळे स्त्रिया, मुली एकट्या बाहेर पडायला घाबरतात व तिच्या स्वातंत्र्यावर परत प्रश्न चिन्ह उभे ठाकते. मग तिला परत बंदिस्त करायचे? यातून हा तर विपरित परिणाम होईल सत्य बोलण्याचा, स्त्रीच्या हक्कांच्या न्यायाच्या लढाईचा!

या देशातील बलात्काऱ्यांना शिक्षा देण्याच्या कायद्यातील त्रुटी आता यानिमित्ताने चर्चिल्या जात आहेत. मथुरा बलात्कार प्रकरणांपर्यंत स्त्रीलाच - म्हणजे जिच्यावर बलात्कार झाला तिलाच कसा बलात्कार झाला, हे सिद्ध करावे लागत असे.

आरोपींना खुशाल मोकळे रान होते. पण त्या मथुरा प्रकरणानंतर देशभर आवाज उठला तेव्हापासून थोडे बदलले. ह्या बलात्काऱ्यांना त्यांनी बलात्कार नाही केला, हे सिद्ध करावे लागतेय. मग ह्या बलात्काऱ्यांनी अरोपींनी त्या पीडित मुलीला-स्त्रीला मारून टाकणे सुरू केले. म्हणजे येनकेन प्रकारेन स्त्रीला न्याय नाकारलाच गेला.

बलात्काराच्या बाबतीत स्त्रीला न्याय देणारे कायदे असावेत. फाशीच्या शिक्षेचा प्रकार हा लांब पल्ल्याचा शिक्षेचा प्रकार आहे. बलात्कार ह्या गुन्ह्याला अत्यंत गंभीर गुन्हा समजला गेला पाहिजे. खुना इतका गंभीर, त्यामुळे तपास हा fast track यंत्रणेने व्हावा. कोर्टाची निर्णयाची (judgement) ची व्यवस्था ताबडतोब करून त्या बलात्काऱ्यांना शिक्षा दिली गेली, हे समाजासमोर आले पाहिजे. त्यांना फाशी देणे न्यायालयात कटकटीचे ठरते, त्यामुळे त्यांना जन्मठेप दिली पाहिजे. जिच्यावर बलात्कार झाला तिला जगण्यासाठी सकारात्मक भाव -व्यवस्था निर्माण करायला पाहिजे. मथुरा ही आदिवासी मुलगी, राजस्थानची भंवरीदेवी हीदेखील या बलात्काराच्या अपघातातून म्हणजे तिने चूक न केलेल्या अपराधी भावातून बाहेर पडून आज सकारात्मक जगते आहे. अशा ह्या विचारांचा प्रसार करावा स्त्रीच्या योनिशुचितेचा बाऊ करून तिला जीवनातून उठवणे- तिला 'जिंदा लाश' वगैरे म्हणू नये तिची जगण्याची उमेद वाढवावी, तिला जगण्याची उर्मी द्यावी. ह्या देशातील मस्तवाल पुरुषसत्तेला धक्का देणारे धोरण राबवावे. स्त्री ही शरीर आहे म्हणून पितापतीपुत्र पुरुषांची मर्जी राखणारी गुलाम आहे. हा पुरुषसत्ताक भाव नष्ट केला पाहिजे. तिला लैंगिकतेमुळे अपमानित करणे किती भयंकर ठरते, हे स्त्रियांनी सक्षमतेच्या लढाईतून दाखवायची गरज आहे. त्याशिवाय स्त्रीवर बलात्कार होणे, हा केवळ स्त्रीचा प्रश्न नाही. तो पुरुषांच्या जनावर बनण्याचा, मानवता विसरण्याच्या घातकप्रवृत्तीच्या वाढीचा भयंकर प्रश्न आहे. त्यामुळे पुरुषांनी सांभाळून तुम्ही यामुळे लवकर नष्ट व्हाल- ह्या विषारी, विखारी प्रवृत्तींना घालवण्यासाठी पुढे सरा. जरा स्वत:ला माणूस बनवा ! स्त्रिला नागवून, तिचा छळ करून कोणताच पुरुष मानव- व्यक्ती म्हणून सामान्य बनणार नाही. तो निर्सगातील स्त्री-पुरुषांना दोघांनाही सन्मान देऊनच पुढे जाईल. बलात्कार हा कुठलाही असो हा जबरदस्तीचा प्रकार आहे. स्वातंत्र्याचा नकार देणारा वा स्वातंत्र्याचा संकोच करणारी बाब आहे. ह्या तरुणीचा बलात्कार अनोळखी पुरुषांनी केला. त्यामुळेही हा सर्वत्र चर्चेचा विषय होऊ शकला पण कुटुंबात, घरात होणारे रोजचे बलात्कार होतात त्याचे काय? २००५ च्या कौटुंबिक अत्याचार विरोधी कायद्यात ह्याचा उल्लेख आला आहे की पतिपत्नीवर शारीरिक जबरदस्ती वा बलात्कार करत असेल तर त्याला गुन्हा समजला जावे - ह्या मुद्यांचा देखील या निमित्ताने विचार करावा लागेल. घरच्या घरी रोज अनेक स्त्रियांवर त्यांच्या पतीदेवाकडून लैंगिक छळ, अपमान, बलात्कार केला जातो. ह्याबद्दल कुठेच बोलण्याची सोय नाही. पारंपरिक पुरुषी वर्चस्वाच्या ह्या समाजात स्त्रीला ही घुसमट सहन करतच जगावे लागते आहे. कुटुंबव्यवस्थेला टिकवण्यासाठी.

बाहेरची घुसमट अशी कधी तरी बाहेर येते, पण आतली तर कडी - कुलुपांतील आहे. एका सोनेरी चौकटीतील आहे, तिला ही कुठेतरी छेद देण्याची तयारी यानिमित्ताने करावी लागेल. तोंड दाबून बुक्क्यांचा मार देणारी ही व्यवस्था आहे, हे स्त्रीने तिच्याबाबतच्या मालकी हक्कांच्या राजकारणाला समजून घेऊन उलथवून पाडावे लागेल. तिच्या मानव म्हणून जगण्याच्या प्रक्रियेतील हा एक भाग आहे, म्हणून पती बलात्कारी असला तर फाशीच्या शिक्षेच्या

मागणीमुळे घरातील बलात्काऱ्याचा कुठेच रिपोर्ट होणार नाही, ही भीती निर्माण होते. आज ज्या काही थोड्या फार बायका ह्या विरुद्ध बोलताहेत. त्यामुळे त्या बोलणे बंद होतील, कारण फाशीमुळे सुधारणेचा प्रवास बंद होतो. सर्व बदलांना बंद बस्त्यात गुंडाळून ठेवावे लागते.

आपल्या देशात स्त्रीबाबत विचार करतांना ब्राह्मणवाद भांडवलवाद व पुरुषसत्ता ह्या एकाच नाण्याच्या वा एकाच अर्थाच्या बाबी आहेत, हे स्त्रीवाद्यांनी समजून घेण्याची गरज आहे. विषमतावादी व्यवस्थेच्या मनूच्या कायद्यांनी स्त्री अत्याचार व स्त्री हत्या उपपातक म्हणजे दुय्यम दर्जाचे पाप मानलं आहे, हेही लक्षात घेतलं पाहिजे. स्त्रीला सुरक्षा द्यायची म्हणजे स्वातंत्र्य नाकारायचं तर्कशास्त्र विकृतीने भरलेलं आहे. हे जुने धर्मशास्त्र आता तरी बदलावे लागेल की नाही? बीजेपी, दुर्गावाहिनी, आरएसएसच्या लोकांनी फार पूर्वीपासून 'बलात्काऱ्यांना फाशी द्या'चा रेटा लावला, ही त्यांची जुनी मागणी आहे. त्यांना या देशातील राज्यघटना मान्य नाही. ते जुने धर्मकायदे लावावे ह्या विचारांचे आहेत. घटना दुरुस्ती करा म्हणणारे व ह्या पुरुषी राजकारण करणाऱ्या सुषमा स्वराज किती स्त्री सन्मानवादी विचारांच्या आहेत, हे नेहमीच त्याच्या राजकिय खेळीवरून दिसते. स्त्रीप्रश्न ह्या धर्मवाद्यांना कधीच उकलवायचा नाही. त्यांना ब्राह्मणवाद, भांडवलवाद पुरुषसत्ता हवा आहे. मग ते धर्मवादी स्त्रीपुरुष त्याला उचलून धरतात. मग तो त्यांच्या साठी complementary ठरते, म्हणून पुरुषसत्तेच्या समर्थकांना वाटते की फाशीची शिक्षा दिली की झाले, मग परिवर्तनाची लढाईची गरज राहत नाही.

बहुजन समाजातील स्त्रियांच्या मुलींच्या लैंगिक शोषणाला उजागर करण्यासाठी आपली संसद, त्यातील स्त्री राजकारणी, प्रसार-प्रचार यंत्रणा अशी कार्यरत राहू लागली तर मग खऱ्या अर्थाने (येथे स्त्रीला देवी वगैरे मानले जात आहे, ते कुठे तरी हास्यास्पद आज ठरलेले आहे.) त्याला आळा घालता येईल, नाही तर पुरुषसत्ता ब्रामणी विचारांच्या स्त्रियांनी ज्यापद्धतीने मांडली तेच मग सर्व उंतरडीवरील जातिधर्माकडे लागू करायला याच्या साऱ्या जबाण्या, लेखण्या सरसावतात, पण ते अपूर्ण आकलन ठरते. ब्राह्मणी मीमांसेतून केलेलं विश्लेषण आजतागायत जोतीबा फुले, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे वा राणी दुर्गावतीला जाणू शकले नाही. बलात्काऱ्यांच्या विरुद्धची लढाई स्त्रियांच्या सन्मानाची लढाई आहे. त्यासाठी थेरीगायेतील स्त्रियांचा आवाज ते संतसाहित्यातील त्यातील कान्होपात्राच्या अभंगाचा स्वर उलगडावा लागेल. बलात्कारी व्यवस्थेला ह्या जबरी विचारांना घालवून द्यायला तयार होण्यासाठी. ह्या बलात्कार प्रकरणाचे एक वैशिष्ट्य दिसून येते की यामध्ये सुषमा स्वराज वा दुर्गावाहिनी फार पुढे आहे. सर्व प्रिंट पत्रकारिता भरभरून बातम्या देत आहे. हे असे प्रियांका भोतमांगेच्या म्हणजे खैरलांजी प्रकारणाबाबत झालेले देशाला दिसले नाही. बीजेपीने या आधी जबलपूरच्या प्रमिला भार्गवची केस अशीच उठवली होती. नंतर नागपूरच्या दातेची या दोघेही स्त्रिया ब्राह्मण व ही त्यांच्यावर जुलूम करणारे मुसलमान, असे त्याचे कथानक होते. आता ह्या दामिनी/निर्भयाला जसे उचलले - ते ह्या संस्कृती रक्षकांनीच, त्यामुळे थोडी साशंकता वाटते. खैरलांजीच्या योनी फाडलेल्या भोतमांगे स्त्रियांबद्दल कुठेच सुषमाताईंना आवाज फुटलेला ऐकू आलेला पाहिला नाही. त्या खैरलांजी प्रकरणातदेखील स्त्रीवर बलात्कार व मग खून हे भयंकर अमानुष कृत्य झाले होते. त्यात बलात्काऱ्यांना फाशी दिली गेली नाही.

फाशी देणे ह्याचे आम्ही तसेही समर्थन करीत

नाही. परदेशात स्त्रिया तोडक्या कपड्यात असतात, तिथे मग काय सर्वत्र बलात्कारच होतात? स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनच ह्या संस्कृतीने चुकीचा मांडलेला आहे, तो आम्हाला या निमित्ताने तपासायचा नाही? पुरुषवर्चस्व हे आक्रमक आहे म्हणून प्रश्न आहे. ही आक्रमकता, वर्चस्ववादी भूमिका फाशीने बदलणार नाही. ती संस्कृतीची केलेली चुकीची मांडणी योग्यप्रकारे बदलवून करावी लागेल. सर्व जातिधर्मांना न्याय हक्काने, जगू दिले तर हे खरे सांस्कृतिक बदल ठरतील. जातीय अभिनिवेशाने गर्विष्ठपणाने घसमुसळेपणाने नीतिअनीतीच्या गप्पा मारून नाही !

आज सारा देश हादरला आहे, हे चित्र पुढे केले जाते. गावातल्या बाईला ही सारी वस्तुस्थिती समजली पाहिजे, तिला ह्या चकचकीत जगाचे राजकारण अज्ञानी ठेवल्यामुळे समजले नाही. स्त्री शरीर हे काचेचे असते असे ही म्हणणारी आई संस्कृतीच ती जपते. तिला तिच्या लेकींना-लेकांना ह्या संस्कृतीची खरी ओळख फाशी दिल्यामुळे न होता त्याबद्दल मानवी जाणिवा विकसित करूनच होईल. बहुजन स्त्रीवाद विकसित केल्यानेच दिल्ली-मुंबईच्या मुली सुरक्षित राहतील. अन्यथा बिहारातील शेतकऱ्यांचे मुले ह्या सामूहिक बलात्काराच्या विषारी गुन्ह्याचे बळी ठरतील वा त्यांच्या आया ह्या पोरांची काम चूक म्हणून नशिबाला दोष देत बसतील. हे भयाण वास्तव बदलावे लागेल. त्यासाठी बहुजन स्त्रीवाद सोप्या भाषेत गावागावांच्या भाषेतून व्यक्त करत व जगतही...

■

प्रा. नूतन माळवी,
लक्ष्मीनगर, वर्धा.
मोब. ९३२५२२२४२७

---

## कविता

कु. उमा ढेपे

*शिवार्पण*

*नभ कितीदा बरसुनी गेले,*
*शिवलिंग न जळात बुडले*
*तो फणा मिरवितो रक्तगंध!*
*डमरू ना मुके जाहले*
*तो खडा त्रिशुल, जागवी साक्ष*
*मौनातच साथीला किती जन्माचा मोक्ष*
*कमळच उमलुनी गेले, अवेळ प्रहरी*
*पानांवर दवांची हळूच कुजबुज झाली*
*झेंपावुनी मग ते बिल्वाला बिलगून गेले*
*तळ्यातूनी कोरडे, शिवमस्तकी अभिषिक्त झाले*

■

परामर्श २

प्रतिभा शिंदे

# समतेसाठी आपण पुरुष

मुली-स्त्रियांकडे केवळ मादी, माता म्हणून न बघता माणूस म्हणून बघण्याचा संकल्प करू या!

दिल्लीत तेवीस वर्षीय मुलीवर चालत्या बसमध्ये झालेला सामूहिक बलात्कार हा अतिशय घृणास्पद, संतापजनक, निंद्य आणि तितकाच धक्कादायक व दु:खद प्रकार होता. दिल्लीत व देशात इतरत्रही त्याविरोधात तरुणाई रस्त्यावर उतरली आहे. त्याबरोबरच देशाच्या वेगवेगळ्या भागांमधूनही स्त्रियांवरील बलात्कार व छेडछाडीच्या अनेक बातम्या अक्षरश: आदळत आहेत. आम्ही या कृत्यांचा नि:संदिग्ध निषेध करत आहोत. अत्याचारित मुलीला लवकरात लवकर न्याय मिळण्यासाठी योग्य ती न्यायालयीन प्रक्रिया चालवून दोषींना कडक शिक्षा दिली गेली पाहिजे. खरे तर स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या सर्वचप्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण लक्षात घेता, वेळकाढूपणा न करता दोषींना शक्य तितक्या लवकर शासन होणे गरजेचे आहे.

खरे तर, बलात्कार करणे ही आपली सत्ता दाखवण्याची एक अमानुष कृती असते. आपले वर्चस्व प्रस्थापित करणे, धडा शिकवणे, उन्माद व्यक्त करणे हे उद्देश त्यामागे असतात. ही सत्ता पुरुष असण्याची आणि त्याबरोबरच पैसा, जात, पद-अधिकार यापैकी एक किंवा अनेक एकत्रित, अशी कशाचीही असू शकते. अशाप्रकारच्या घटना देशात-जगात अनेकदा घडल्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानी सैनिकांनी वेगवेगळ्या देशातील शेकडो स्त्रियांवर बलात्कार केले होते. १९९२ मध्मे राजस्थानमध्ये भंवरीदेवी यांनी वरच्या मानलेल्या जातीतील कुटुंबात होणारा बालविवाह रोखला, म्हणून त्यांच्यावर बलात्कार झाला होता. गुजरातमध्ये २००२ साली घडवल्या गेलेल्या दंगलींमध्ये अनेक स्त्रियांवर सामूहिक बलात्कार केले गेले. ईशान्य भारतात २००४ मध्ये मनोरमा या स्त्रीवर भारतीय सैनिकांनी सामूहिक बलात्कार करून तिची हत्याही केल्यानंतर काही स्त्रियांनी सैन्य मुख्यालयासमोर विवस्त्र होऊन भारतीय सैन्य आमच्यावर बलात्कार करते, असा फलक झळकवत निदर्शने केली. तेव्हा कुठे संपूर्ण देश हादरला होता! काश्मीरमध्येही अनेक स्त्रियांवर सैनिकांनी व दहशतवाद्यांनी बलात्कार केले आहेत. छत्तीसगडमध्ये निमलष्करी दलातील सैनिक अथवा पोलीसांकडून आदिवासी स्त्रियांवर बलात्काराच्या

अनेक घटना घडल्या आहेत. मुंबईत एका पोलीसाने मुलीवर बलात्कार केला होता. शहरी-ग्रामीण, दलित, आदिवासी, लहान-तरुण-वृद्ध, वगैरे सर्वच स्त्रियांवर अत्याचार, लैंगिक हिंसा घडत असते. अशा घटनांची यादी खूप मोठी आहे. अलिकडे अल्पवयीन मुलांनी अल्पवयीन मुलींवर केलेल्या बलात्काराची प्रकरणेही उघडकीस आली आहेत.

थोडक्यात, अशा घटना सर्वत्र-सर्वकाळ घडत असतात. त्यातल्या कित्येक नोंदवल्याच जात नाहीत. शिवाय लग्नाच्या नात्याअंतर्गत स्वत:च्या पत्नीशी जबरदस्तीने केलेले संबंध आपल्याकडे मोठ्या प्रमाणात घडत असतात आणि ते समाजमान्यही असल्याचे दिसून येते. आता उठलेल्या चर्चेच्या वादळात त्याबद्दल चकार शब्दही कोणी काढत नसले तरी काही देशांमध्ये विवाहाअंतर्गत बलात्कार ही संकल्पना कायद्यामध्ये अंतर्भूत असून तो शिक्षापात्र गुन्हाही आहे, याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

मुलीवर-स्त्रीवर बलात्कार होतो अथवा त्यांची छेडछाड होते, याला त्यांचे कमी कपडे कारणीभूत असतात, असे अनेकांना वाटते. मग सहा महिन्यांच्या मुलीवर किंवा सत्तर वर्षांच्या वृद्धेवर बलात्कार होतात, तेव्हा त्यांनी कोणते कमी कपडे घातलेले असतात? असा प्रश्न विचारावा लागतो.

शिवाय, कपडे कमी आहेत हे कोणत्या निकषावर ठरवायचे? आणि मुलांनी कमी कपडे घातले तर मुली त्यांची छेड का काढत नाहीत? हे तर खूपच मूलभूत प्रश्न आहेत. कारण बुरखा किंवा अंगभर साडी घातलेल्या स्त्रीवरही बलात्कार होत असतात किंवा तिची छेडछाडही होत असते, आणि पुरुष उघडा फिरला तरी त्याला बघून कोणी मुलगी शिट्टी मारताना दिसत नाही! मुलींनी मर्यादेमध्ये वागावे अशी अपेक्षा करणारा समाजपुरुषांनी कोणत्या मर्यादा पाळाव्यात याबद्दल चकार शब्द काढत नाही. त्यामुळे दोष मुलीचा-बाईचा, कपड्यांचा वगैरे नसून पुरुषी नजरेचा आहे, हे वास्तव आपल्याला स्वीकारावेच लागणार आहे.

बलात्काऱ्याला कडक शिक्षा झाली पाहिजे, हे तर नक्कीच. पण फाशी देऊन बलात्काराचे अथवा अत्याचारांचे प्रमाण कमी होणार नाहीत. त्यासाठी मुली-स्त्रियांना सर्व दृष्टीने सक्षम होण्यासाठी, निर्भयपणे वावरता येण्यासाठी वातावरण तयार करावे लागेल आणि पुरुषप्रधान मानसिकताही बदलावी लागेल. बलात्कार-छेडछाडीबरोबरच अगदी रोजच्या रोज अनेक ठिकाणी स्त्रियांच्या निरनिराळ्या कारणांमुळे हत्याही होत असतात. त्यापैकी सर्वांत जास्त कुटुंबामध्येच घडतात. हुंड्यापायी अथवा इतर कारणांमुळे होणारा छळ किंवा हत्या-आत्महत्या, बालविवाह, गर्भलिंगनिदान व बलात्कार-छेडछाड हे एकाच व्यवस्थेचे निरनिराळे पैलू आहेत. ही अन्यायकारक व्यवस्था बदलायची असेल तर फक्त कधीतरी रस्त्यावर उतरून भागणार नाही. त्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर सातत्याने काम करावे लागेल.

बलात्कार म्हणजे बाईचा मृत्यू किंवा तिच्या इज्जतीवरील घाला असतो, ही पितृसत्ताक-जातीयवादी विचारसरणी आहे. त्यातूनच बलात्काऱ्याला फाशीची शिक्षा असावी, अशी मागणी येते आणि अनेकजण भाबडेपणाने ती उचलून धरतात. तो एक अपघात होता आणि त्यातून सावरण्यासाठी तिला सर्वप्रकारची मदत उपलब्ध होण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे. त्यासाठी शासनाने आवश्यक ती पावले उचलण्यासाठी दबावही आणला पाहिजे. उलट, फाशी होणार असेल तर बलात्कारानंतर स्त्रियांना ठार मारले जाण्याचे प्रमाण वाढेल. शिवाय फाशी देणे, बलात्काऱ्याचे हातपाय

पुढील भाग पान न. ३४ वर

आरोग्य
संपदा

डॉ. सुवर्णा तांबडे

# मुलींचे आजार आणि उपचार

आपल्याकडे जुन्या काळात मुलीच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले जात नसे. उलट मुलींनी कमी खावे, कारण कमी खाल्ल्यामुळे त्यांची वाढ होणार नाही. मुली भरभर वाढल्या की, लवकर लग्नाला येतील. मुलगी उपवर झाली की आई-वडिलांची काळजी वाढली. म्हणून मुलींना कमी जेवन दिले जायचे. आमच्या शेजारीपाजारी मुलांना भरपूर पोषक आहार दिला जायचा आणि मुलींना कमी पोषक व मोजकाच आहार दिला जायचा, मी स्वत: पाहिले आहे. नंतर मी मोठे झाले आणि ॲलोपॅथी औषधांचा (Allopathy Medicine) चा अभ्यास केला. तेव्हा मला कळले की, मुलींच्या वाढीच्या वयामध्ये जेव्हा त्यांना पूरक, सकस आहाराची गरज असते, त्याचवेळी नेमकं त्यांना कमी आहार दिला जातो, ही पद्धत एकदम चुकीची आहे.

जुन्या काळातील अजून एक चुकीची पद्धत म्हणजे गर्भवती महिलांना पण कमीप्रमाणात आहार दिला जायचा. कारण काय? तर गर्भवती महिलांनी जास्त आहार घेतला तर पोटातील मुलाची वाढ व्यवस्थित होईल आणि मुलं वाढले की, बाईला बाळंतपणात होणारा जास्तीचा त्रास होईल. म्हणून गर्भवती महिलेने कमी खावे व जास्त काम करावे. म्हणजे बाळाची वाढ होणार नाही आणि बाळंतपणात कमी त्रास होईल. आता ही पद्धत किती चुकीची आहे हे कळण्यासाठी डॉक्टर होण्याची जरूर नाही. गर्भवती महिलेला पूर्ण चौरस आहार मिळायला हवा हे आता सर्वांना माहीत आहे. सरकारी आरोग्य केंद्रांमधून गर्भवती महिलांच्या आहाराविषयी माहिती, मार्गदर्शन केले जाते. या काळात मातेला भरपूर प्रमाणात कार्बोदके, प्रथिने, जीवनसत्वे, कॅल्शिअम, लोह यांची जरुरी असते. आणि या सर्व घटकांचे प्रमाण साधारणतः दीडपट असते. म्हणून मातेचा आहार हा चौरस व पूरक असायला हवा. तिच्या गर्भातील बालक व्यवस्थित असेल तरच बाळाची वाढ व्यवस्थित होईल. नवीन जन्माला येणारे बालक सदृढ, निरोगी होईल.

मुलीच्या वाढत्या वयात त्यांना पण कार्बोदके, प्रथिने, जीवनसत्वे, खनिजद्रव्ये या सर्व घटकांची जरुरी दीडपट प्रमाणात असते. म्हणून मुलींना त्यांच्या वाढीच्या वयात व्यवस्थित चौरस आहार द्यावा. पण उलट या वयात मुली Dieting करतात. वजन वाढू नये म्हणून कमी खातात आणि काही खाल्लेच तर

Mcdonald किंवा तत्सम फास्टफूडच्या हॉटेलमध्ये जावून काहीतरी अरबट-चरबट खातात. ज्यामध्ये सर्व पोषणद्रव्ये, सर्व पोषक घटक मिळत नाहीत.

आहार पोषक नसेल तर वाढ व्यवस्थित होत नाही. आहार पोषक नसल्यामुळे पंडुरोग होतो. कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे हाडांची वाढ व्यवस्थित होत नाही. लोह आणि कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे पायांना पेटके येणे, अशक्तपणा येणे इत्यादी गोष्टींचा त्रास मुलींना होतो. म्हणून मुलींनी आहार व्यवस्थित घ्यावा. तसेच डॉक्टरांच्या सल्याने कॅल्शिअम किंवा लोहाच्या गोळ्यापण घेता येतात.

मुलींची आणखी एक कायमची समस्या म्हणजे पाळीमध्ये ओटीपोटात दुखणे. हा त्रास ७० ते ७५% मुलींना होतो. यामध्ये काही शारीरिक दोष असतो असे नाही त्यामुळे घाबरण्यासारखे काही नाही. थोडाफार त्रास असेल तर आराम करावा. काही विशिष्ट योगासनांनीही पाळीमधे ओटीपोटात दुखणे कमी होते. खूप त्रास होत असेल तर डॉक्टरांना दाखवावे. डॉक्टरांच्या सल्ल्याने सोनोग्राफी किंवा औषध उपचार करता येतात. पाळी अनियमित येणे ही पण मुलींची एक कायमची समस्या असते. पाळीच्या सुरुवातीच्या काळात ती अनियमितच असते. मुलींच्या शरीराची वाढ पूर्ण झालेली नसते. त्यामुळे पाळी सुरू झाल्यानंतर पहिले १-२ वर्ष पाळी नियमित आली नाही तर घाबरून जाऊ नये. पण २-३ वर्षानंतर ही पाळी जर अनियमीतचं राहिली तर मात्र डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील तपासण्या आणि औषधोपचार करावेत.

रजोनिवृत्ती (मेनोपॉज):

बायकांच्या जीवनात ४५ ते ५० या वयात होणारा महत्त्वाचा बदल म्हणजे पाळी जाणे. यालाच रजोनिवृत्ती किंवा मेनोपॉज असे म्हणतात. रजोनिवृत्ती ही एकदम नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे या गोष्टींचा बायकांनी ऊगीच बाऊ करू नये. पाळी जशी सुरू झाली तशी बंदपण झाली. हे अगदी नैसर्गिक आहे असा विचार करावा. पण ही प्रक्रिया नैसर्गिक असली तरी बायकांना या काळात बराच शारीरिक व मानसिक त्रास होतो. शारीरिक त्रास म्हणजे छातीत धडधड होणे, अचानक घाम येणे, चलबिचल होणे, पाठ-कंबर दुखणे, सांधे दुखणे इत्यादी त्रास होतो.

हा सर्व त्रास स्त्रियांच्या शरीरातील Estrogen, Progesteron हे  हार्मोन्स कमी होतात. त्यामुळे शरीरातील कॅल्शिअम कमी होते. याच वयात बायकांना बी. पी. वाढणे, रक्तातील साखर वाढणे असेही त्रास होतात. म्हणून या वयात बायकांनी व्यवस्थित चौरस आहार घ्यावा. आहारात कॅल्शिअमचे प्रमाण जास्त असावे. सोयाबीनचा आहारात समावेश केला तर त्यामध्ये नॅचरल Estrogen आपल्याला मिळते. म्हणून सोयाबीनचे पिठ दररोजच्या आहारात घ्यावे. कॅल्शिअम दूध, ताक, दही या अन्न पदार्थातून मिळते. हे सर्व स्त्रियांनी भरपूर प्रमाणात घ्यावे. व्यायाम, योगासने, प्राणायाम नियमित केल्यामुळे बरेच शारीरिक आजार कमी होतात. या काळात मानसिक चलबिचल, नैराश्य, उदासीनता, बेचैनी असे आजार पण बायकांना होतात. नियमित ध्यानधारणा केली तर मन स्थिर राहते. पोषक आहार, नियमित व्यायामांनी बरेच त्रास कमी होतात. पण त्रास अगदीच असह्य असेल तर डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्यावा. ■

डॉ. सुवर्णा तांबडे,
नाशिक.
मोब. ९४२०५९२१८८

वेध १

मुक्ता सोनवणे

# शहरातलं शहर

कॉर्पोरेट जगात शिरल्यापासून शहरांवरती भाष्य करणारे काही सिनेमे खूप आपलेसे वाटायला लागलेत. आपल्या आजूबाजूच्या लोकांवरतीच जणू हे बोलत आहेत असे वाटते. मी ह्या सिनेमांशी आयडेंटीफाय होते. त्यात मला सध्या सगळ्यात जवळचे वाटणारे दोन सिनेमे 'लाईफ इन अ मेट्रो' आणि 'रॉकेट सिंग.'

हे दोन्ही खरेतर वेगवेगळ्या धाटणीचे आहेत. एक पुर्णतः शहरावरती, शहरातल्या माणसांच्या नात्यागोत्यांवरती भाष्य करणारा तर दुसरा शहरातल्या कॉर्पोरेट जगावरती भाष्य करणारा आहे. एक सिनेमा कॉर्पोरेटमधल्या नात्यांबद्दल, त्यांच्या एकूणच गुणधर्मांबद्दल बोलतो, तर दुसरा झपाट्याने बदलत जाणाऱ्या शहरातल्या माणसांमधल्या नात्यागोत्यांबद्दल बोलतो. दोन्ही सिनेमांमध्ये मला काहीतरी सहसंबंध जाणवतो. मेट्रो पाच कहाण्या सांगतो. ह्या सगळ्या कहाण्यांमधली पात्र एकमेकांशी जोडलेली आहेत आणि एकमेकांवरती परिणाम करतात.

खूप महत्त्वाकांक्षी, कमी वेळात पट्कन पुढे जाऊ पाहणारा राहुल. आपल्या बॉससोबत झोपून सगळे फायदे मिळवलेली, पण त्याच्यात भावनिकरीत्या गुंतलेली नेहा. गेल्या नऊ वर्षांत आपल्या लग्नात आलेला कोरडेपणा व जाणवणारा कटुपणा आणि आकाशच्या रूपाने वाट्याला आलेले ओलाव्याचे थोडेफार शिंतोडे उपभोगताना अपराधबोधात गेलेली शिखा, २६ वर्षांची. परफेक्ट नवरा बॉयफ्रेंडच्या शोधात डिसपेरेट होत चाललेली श्रुती. आपल्या अवतीभोवती असणाऱ्या माणसांच्या महत्त्वाकांक्षाचा, भावनांचा, प्रेमाचा, अपराधबोधाचा स्वतःसाठी नीट वापर करून घेणारा आणि त्याच समर्थन करणारा रणजित. आणि ४० वर्षांनी आपल्या प्रेयसीकडे परत आलेला धर्मेंद्र ही ह्या सिनेमातली मुख्यपात्र.

पट्कन मोठं होण्यासाठी, पैसे कमावण्यासाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार असलेला राहुल यशाचा शॉर्टकट म्हणून आपल्याच ऑफिसमधल्या लोकांना त्याची खोली त्यांना हव्या त्या व्यक्तीसोबत झोपण्यासाठी देतो. आणि त्याच्या बदल्यात आपल्या प्रमोशनची रेकमेंडेशन्स त्यांना द्यायला लावतो. मात्र आपल्या बॉसची सेक्रेटरी असलेल्या नेहाबद्दल त्याला सॉफ्टकॉर्नर असतो. आणि तिचा सहवास मिळवण्यासाठी छोटेमोटे किस्से तो करत असतो.

एकदा रणजित बॉससोबत झोपल्यानंतर आपला वापर होतोय हे जाणवणारी, रणजितशी भांडण झालेली आणि फस्ट्रेट होऊन विष पिऊन बेशुद्ध पडलेली नेहा त्याला आपल्याच खोलीत सापडते. हॉस्पिटल वगैरे भानगडी झाल्यानंतर काही दिवस नेहा राहुलकडेच राहायला येते. आपली रुममेंट श्रुतीला त्याबद्दल कळू नये म्हणून ह्या काळात एकत्र राहताना दोघांनाही एकमेकांबद्दल काही गोष्टी समजतात-उमजतात. दोघे जवळ येतात पण आपल्या करिअरमध्ये, पुढे जाण्याच्या रस्त्यात ह्या गोष्टी अडथळे निर्माण करू शकतात. हे लक्षात आल्यावर मात्र दोघे आपापल्या मार्गाला लागतात.

मात्र सिनेमाच्या शेवटी आपल्या महत्वाकांक्षेपाठी न जाता राहुल आपल्या मनाचे ऐकतो आणि रणजितला नेहासोबत जाण्यासाठी त्याच्या खोलीची चावी द्यायला नाकारतो. त्याचं प्रमोशनही नाकारतो, नोकरी सोडतो आणि नेहाला हे काहीही न सांगता मुंबई सोडून आपल्या गावी जायला निघतो. नेहाला पुढे जेव्हा हे सगळं रणजितकडून कळतं तेव्हा ती ही सगळं सोडून(रणजितला सोडून) राहुलला भेटायला स्टेशनवर येते. महत्त्वाकांक्षेच्या दुष्टचक्रातून दोघेही बाहेर पडतात.

दुसरी कहाणी म्हणजे रणजित आणि शिखाची. त्यांच्यात आलेला कोरडेपणा. शिखाची होणारी घुसमट, आकाशकडून मिळणारे प्रेम, ओलावा, ही ती तिच्या अपराधबोधामुळे उपभोगू शकत नाही. रणजितच्या सगळ्या गोष्टी माहीत असताना जेव्हा ती त्याला आकाशबद्दल सांगते तेव्हा पुरुषी इगो दुखावलेला रणजित तिलाच इमोशनल ब्लॅकमेलींग करतो. आणि आकाशसोबत जायचा मार्ग मोकळा असूनही आपल्या पोरीपायी ती रणजितसोबतच राहण्याचा मार्ग निवडते. परफेक्ट प्रेमाच्या शोधात असणारी श्रुती वयानुसार दबली व एकटी पडत चाललेली असते. जे काही प्रेमप्रकरण तिचे होते त्यातही तिचा वापरच होतो. पण परफेक्ट माणूस काही मिळत नाही. वयाने तिच्यापेक्षा बऱ्यापैकी मोठा असणारा मॉंटी तिचा चांगला मित्र होतो आणि त्या सगळ्या काळात तिच्यासोबत भक्कम उभा राहतो. परफेक्टचा नाद सोडून श्रुती शेवटी मॉंटीला तिच्या मनातलं खरं काय ते सांगते आणि ते दोघे एकत्र येतात.

ह्या सगळ्या कहाण्यांतील पात्र कुठे, कधी पैसा, कधी महत्वाकांक्षा कधी अपराधबोध कधी परफेक्टनेस ह्यात अडकून आपल्या भावनांना मनातल्या ओलाव्याला, प्रेमाला कळत-नकळत नाकारताना ७० वर्षांचा धर्मेंद्र मात्र ४० वर्षांनी जगाची आपली पोरं काय म्हणतील ह्याचा विचार न करता आयुष्याचे शेवटचे काही दिवस तरी सुखाने जगावेत ह्यासाठी आपल्या प्रेयसीला भेटायला परत येतो.

अशा वेगवेगळ्या कहाण्यांनी गुंफलेला मेट्रो शेवटी मुंबईचा जीव असणाऱ्या व्ही.टी. स्टेशनवरती येऊन थांबतो. खरंच शहराची कहाणी सांगतो. ह्या सिनेमातील सगळ्या व्यक्ती मला ओळखीच्या वाटतात. कुठेतरी भेटल्या आहेत असं वाटतं. आयडेंन्टीफाय करू शकते. त्यांच्यासोबत प्रेम, मैत्री ह्यापेक्षा पुढे जाणं महत्त्वाचं असणाऱ्या शहरामधल्या माणसांची घुसमट खूप छान टिपली आहे. ह्या सिनेमात 'छोटी मछली को बडी मछली खाती है और बडी मछली को उससे ही बडी मछली खती हैं।' हे चक्र दर वेळेला दिसतंच असं नाही. नुसतंच जाणवत राहतं आणि ज्या माणसासोबत हे होतंय ते मुक्का मार खाल्ल्यासारखं आपल्या जखमांना लपवत राहतात. कारण आपल्या जखमा आपली व्हेलनेरबिलीटी कुणाला दिसली तर त्याचं अजून जास्त शोषण होण्याचीच शक्यता ह्या जगात जास्त

असते. आणि अशी जखमी माणसंसुद्धा खूपदा बाकीच्यांच्या भावनाचं विरंगुळ्यासाठी वापर करतात कोण कोणासाठी कधी इंटरटेनमेंट म्हणून वापरला जाईल याचा भरवसा नाही.

शहरातलं शहर उभा करणारा दुसरा सिनेमा म्हणजे 'रॉकेटसिंग' नुकताच शिक्षणपूर्ण झालेला हरप्रितसिंग बेदी मोठ्या कॉम्प्युटर कंपनीत सेल्समन म्हणून कामाला लगतो. कामाच्या पहिल्या दिवसापासूनच किंबहुना इंटरव्ह्यूपासूनच त्याला असा फॅड दिला जातो की तो काही करण्याच्या लायकीचा नाही. त्याला काही कळत नाही, काही येत नाही, तो शुन्य आहे. फालतू आहे. ऑफिसमधल्या बाकी लोकांचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन अतिशय तुच्छतेचा आणि मजा बघण्याचा. चला नवीन बकरा फसला लहानपणापासून आपल्या आजोबासोबत राहत असलेला हरप्रित 'इमानदारीसे कमाव-इमानदारीसे खाओ.' ह्या मूल्यव्यवस्थेत वाढलेला, पण इथे नोकरी टिकवण्याची सुरवातच मुळी अप्रामाणिकपणातून होते. ह्यापासून अनभिज्ञ असलेला हरप्रित एका कंपनीच्या मॅनेजरकडून लाच घ्यायला नाकारतो. त्याची कंम्प्लेट करतो. आणि त्याची कंपनी त्यांचा हा डाइन्ट हरवून बसते.

आपली काय चूक झाली, ह्या विचारात असतानाच कंपनीच्या सी. ई. ओ.कडून हरप्रित खूप घाणेरड्यापद्धतीने, अत्यंत घाणेरड्या शब्दांत ओरडा खातो. भयंकर टेन्शनमध्ये गेलेला हरप्रित शेवटी ठरवतो आपण शुन्य नाही आहोत हे प्रुव्ह करायचो आणि आपल्याच सी. ई. ओ.च्या नावाखाली स्वतःची एक छोटीशी कंपनी सुरू करतो. हे ठरवून की ऑफिसचं इन्फ्रास्ट्रक्चर वापरण्यात आलेला खर्च तो सव्याज आपल्या सी. ई. ओ.ला परत करेल. ऑफिसमधली बाकीचे काही लोक जे त्याच्याकडे तुच्छतेने बघत असतात. फालतू म्हणून वागत असतात. वरवर कितीही इनडिफरन्ट आणि मुरलेली असल्यासारखी वागत असली तरी कॉरपोरेटच्या एकूणच चढा-ओढीत, स्पर्धेत पॉलिटीकलमध्ये फस्ट्रेट झालेल्या लोकांना त्यांचा बॉस तो आपल्या कंपनीत पार्टनर म्हणून घेतो.

चहावाला म्हणून काम करणाऱ्या माणसाला तो पार्टनर म्हणून घेतो आणि त्याच्याकडे असलेल्या कौशल्यांना अवकाश मिळवून देतो. ह्या कंपनीचे दोनच नियम असतात. आणि प्रामाणिक कोणतीही लाच न घेता कस्टमरच्या प्रश्नांसाठी, प्राब्लेमसाठी नेहमी तयार असणे ही सगळी माणसं ऑफिसचं काम सांभाळत. एक्स्ट्रा वेळ काढून ही कंपनी सांभाळायला लागतात आणि ही कंपनी बऱ्यापैकी चालायलाही लागते. आणि त्याच्या सी.ई.ओ.च्या नजरेत यायला लागते.

शेवटी त्याचं सगळं गुपीत सी.ई.ओ. समोर फुटतं तो हरप्रितकडून फुकवत ती कंपनी विकत घेतो. हिसकावून घेतो आणि त्याला कामावरून काढून टाकतो. पण कस्टमर सेन्ट्रींक असणारी नफ्यापेक्षा माणसाला प्राधान्य देणारी कंपनी सी.ई.ओ.ला चालवायला जमत नाही आणि शेवटी हरप्रितला तो त्याची कंपनी परत देऊन टाकतो. कॉर्पोरेटमधले इतके सूक्ष्म पदर कदाचित कॉर्पोरेटमध्ये काम केलेला माणूसच बघू शकतो. कॉम्प्युटर इंजिनियर म्हणून कॉर्पोरेटमध्ये काम केलेला लेखक जयदीप याने आपल्या कॉर्पोरेटमधल्या अनुभवविश्वातले बरेच पदर ह्या सिनेमात आणले असावेत. कार्पोरेट कल्चरमध्ये मुरलेल्या लोकांची बॉडी लॅग्वेज, मुलीकडे पाहण्याच्या नजरा, कॉमेन्ट्स, कॉर्पोरेटमध्ये मूलतःच असणारी स्पर्धा, स्पर्धेमुळे, चढाओढींमुळे माणसामाणसांत एकमेकांबाबत घसरलेली संवेदनक्षमता आपल्याला स्पर्धा म्हणून उभ्या राहणाऱ्या प्रत्येक गोष्टीला चिरडून पुढे जाण्याचा कार्पोरेटमधून प्रतिबिंबित होणारा

भांडवलशाहीचा गुणधर्म ह्या सगळ्या गोष्टी खूप सूक्ष्मपद्धतीने टिपल्यापासून इथे आणि नफ्यापेक्षा माणूस महत्त्वाचा असा हळूच मुव्हेन्ट पण सिनेमा देऊन जातो. खूप मायांनी आणि विरोधाभासांनी भरलेलं जग आहे. हे कॉर्पोरेट म्हणजे ह्याच्यामागे काही इतिहास नव्हता. आणि त्याच्यापुढे काही भविष्य नाही असा फिल देणारं एका बाजूला अमर्याद स्वातंत्र्य दुसऱ्या बाजूला प्रचंड असुरक्षितता, एकटेपणा कॉर्पोरेटमधल्या अनंत माणसांच्या अनंत कहाण्या, एकटी पडलेली जखमी माणसं खूप आहेत. इथे आणि त्यांच्या भावनांचा फायदा घेणारी पण. शहर कुठलंही असो, कॉर्पोरेट शहर सगळीकडे सारखीच दिसतात.

नुकतीच कॉर्पोरेट जगात शिरल्यामुळे इतक्यात कोणत्याही स्पष्ट निष्कर्षाला पोहचता येत नाही. पण मायावी जगाची कोंडी उलगडण्याचा ह्या दोन सिनेमांच्या निमित्ताने केलेला हा एक छोटासा प्रयत्न. ■

## कौटुंबिक हिंसा :

मैत्रिणींनो, यावेळेस आपण खूप सोप्यापद्धतीने कायद्याची माहिती करवून घेऊया. स्त्रिया, मुलींवर घरांमध्ये घडणाऱ्या हिंसा, गुन्हे थांबवण्यासाठी असणाऱ्या कायद्यासंदर्भात माहिती घेऊ या. म्हणजे अडचणीच्या वेळेला ही माहिती आपल्याला उपयोगी पडेल. यापद्धतीच्या घटनांमध्ये स्त्रीला मोफत कायदेविषयक सल्ला घेण्याचा अधिकार आहे. या गुन्ह्यांसाठी सुरुवातीला फक्त इंडियन पिनल कोड ४९८-अ या तरतुदीद्वारा गुन्हा नोंदवता येत होता. यामध्ये विवाहित स्त्रियाच फक्त आपल्या पतीच्या विरोधात गुन्हा, तक्रार नोंदवू शकत होत्या.

पीडब्ल्यूडी व्ही ॲक्ट (प्रोटेक्शन ऑफ विमेन फ्रॉम डोमॅस्टिक व्हॉयलन्स ॲक्ट २००५) च्या माध्यमातून आता घरातील अत्याचाराला बळी पडणाऱ्या सगळ्याच महिला म्हणजे लग्न झालेल्या, अविवाहित असणाऱ्या, आई, बहीण, काम करणाऱ्या स्त्रिया, वृद्ध स्त्रिया आदी सगळेच जण गुन्हा नोंदवू शकतात.

पीडब्ल्यूडीव्ही ॲक्टमध्ये तुम्ही पोलिस स्टेशनमध्ये डायरेक्ट इन्स्टिडेंट रिपोर्ट (डीआय आर) म्हणजे गुन्ह्याची सरळ तक्रार नोंदवू शकता. यासाठी तुम्ही माजिस्ट्रेट कोर्टाकडे किंवा एखाद्या संस्थेकडून किंवा एखाद्या एनजीओकडून गुन्हा नोंदवू शकता.

हा खूप परिणाम करणारा कायदा आहे. तीन दिवसात आरोपी पकडून तीन महिण्यात केस उभी राहते. त्रासलेल्या किंवा पीडित महिलेला सुरक्षितता पुरवली जाते. तिला अत्यावश्यक गरजांसाठी भत्ताही मागता येतो.

या कायद्याने शारीरिक, मानसिक, भावनात्मक, मौखिक, विनयभंगात्मक किंवा आर्थिक अशा कोणत्याही हरकतीला, घटनेला गुन्हा मानला जातो. महिलांना अपमानास्पद वागणूक, भाषा, अश्लिल हावभाव करून बोलणे, खासगीपणा भंग करणे किंवा अशापद्धतीचे प्रयत्न करणे, यासाठी पिनल कोड ५०९ च्या अंतर्गत गुन्हा दाखल करता येतो.

गुन्हा दाखल करायला गेलेल्या स्त्रीला दिवसा, उजेडी तिची तक्रार दाखल करून घेऊन सूर्यास्तापूर्वी सोडायला हवे. सूर्यास्तानंतर तिला थांबवून ठेवता येत नाही.

कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर १५४ प्रमाणे पीडित महिला साक्षर असेल तर तिला एफआयआर हिंदी, इंग्रजी किंवा आपल्या प्रादेशिक भाषेतून लिहून देऊ शकते. जर स्त्री साक्षर नसेल तर लिहून दिलेला एफआयआर पोलिसांनी त्या स्त्रिला वाचून दाखवणे बंधनकारक आहे. ■

रिपोर्ताज

अरुण करांडे

# निसर्ग मानव केंद्रित लोकांची चळवळ

श्रीलंकेमध्ये निसर्ग मानव केंद्रित लोकांच्या चळवळीची पाचवी परिषद आयोजित केली होती. सदर परिषद कोलंबो, श्रीलंका येथील फोक आर्ट सेंटर (folk arts centre) मधील सभागृहात दि. १२ व १३ डिसेंबर २०१२ अशी दोन दिवस होती. कॉ. वासुदेवा ननायकारा हे या परिषदेचे स्थानिक आयोजक होते.

या परिषदेला सात दक्षिण आशियायी देशाच्या प्रतिनिर्धींना आमंत्रित केले होते. भारत, पाकिस्तान, नेपाळ, तिबेट, बांग्लादेश व श्रीलंका या दक्षिण आशियायी देशामधून अंदाजे २०० प्रतिनिधी परिषदेला हजर होते. भारतातून साधारणतः ६० ते ७० प्रतिनिधी महाराष्ट्र, राजस्थान, जम्मू काश्मीर, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, आंध्र प्रदेश, ओरिसा, तामिळनाडू इ. राज्यांतून आलं होते. या परिषदेसाठी महाराष्ट्रातून कॉ. विलास सोनवणे, सौ. शोभा करांडे व अरुण करांडे परिषदेस उपस्थित होते.

दिनांक १२ डिसेंबर २०१२ रोजी सकाळी १० वा. या परिषदेचे उद्घाटन झाले. ही लोकांची चळवळ सध्या दक्षिण आशियायी देशामधील लोकांमध्ये चांगलेच जोर धरू लागली आहे. या परिषदेमध्ये कॉ. सज्जन कुमार (भारत) यांनी प्रत्येक दक्षिण आशियायी देशामध्ये निसर्ग केंद्रित चळवळी बाबत सखोल चर्चा करण्याकरता मसुदा कार्यक्रम पत्रिका सादर केला. सदर मसुदा प्रत्येक देशाच्या प्रतिनिधींनी विस्तृतपणे मांडला. या मसुद्यावर प्रत्येक देशाच्या प्रतिनिर्धींनी खुली चर्चा केली. निसर्ग-मानव केंद्रित लोकांची चळवळ ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आहे. पर्यावरणाचा ऱ्हास कसा थांबवता येईल? व निसर्ग कसा जपायचा? याबाबत प्रत्येक देशांनी त्यांच्या अडचणी व उपयुक्त मुद्दे मांडले. दक्षिण आशियायी देशाचे विभागीय संघटन हे एकमेकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे. आजपर्यंत या चळवळीला बऱ्याच अडचणी आल्या आहेत. तसेच चळवळीचा परफॉरमन्स म्हणावा तसा नाही.

जगातील सर्व तथाकथित प्रगत राष्ट्रांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दबावाखाली नफा व बाजारकेंद्रीत विकासाची धोरणे राबवल्यामुळे गेल्या दोनशे वर्षांत निसर्गाच्या शोषणामुळे पर्यावरणाचा प्रचंड असमतोल निर्माण झाला आहे. या संदर्भात प्रथम क्योटो (जपान) व त्यानंतर दोहा (कतार) येथे झालेल्या

जगातील सर्व राष्ट्रांच्या बैठकीत यावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली, परंतु कार्बन क्रेडिटच्या मुद्यांवर सर्वांत जास्त प्रदूषण निर्माण करणाऱ्या देशांनी या बैठकीतून कुठलीही फलनिष्पत्ती होऊ दिली नाही. आज घडीला पर्यावरणाचा समतोल बिघडवणाऱ्या कार्बन मोनो ऑक्साईड, कार्बनडायऑक्साईड, मिथेन इत्यादी विषारी वायूंच्या निर्मितीमध्ये अमेरिका, चीन व भारत ही राष्ट्रे आघाडीवर आहेत. जगात निर्माण होणाऱ्या एकूण दूषित वायूपैकी जवळपास पन्नास टक्के दूषित वायू या तीन देशात निर्माण होतो. परंतु जागतिक पर्यावरण चळवळीला कोणतीही एकमताची भूमिका या देशांच्या आडमुठेपणामुळे घेता येत नाही.

कोणते देश अधिक प्रदूषण निर्माण करतात हा प्रश्न बाजूला ठेवला तरी या प्रदूषणाचे परिणाम पृथ्वीवरील सर्वच सजीवांना भोगावे लागत आहेत, लागणार आहेत. या प्रदूषणामुळे उत्तर व दक्षिण ध्रुवावरील हिमनग मोठ्याप्रमाणात वितळण्यास सुरुवात झाली आहे. दहा वर्षांपूर्वी पूर्वीच्या शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार हिमनगाच्या वितळण्याने समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन सन २०५० पर्यंत जगातील अनेक बेटे पाण्याखाली बुडतील. तसेच उदाहरणार्थ, मालदीवसारखे देश, लक्षद्वीप, अंदमान-निकोबार बेट, दियागो, गाशीयासारखी बेटे पाण्याखाली बुडण्याचा धोका होता. परंतु गेल्या दहा वर्षांत ज्या वेगाने प्रदूषणात वाढ झाली, त्यामुळे जागतिक तापमानात झालेल्या वाढीमुळे हिमनगाच्या वितळण्याचा वेग वाढला आहे. त्यामुळे सन २०५० ऐवजी २०२०-३० च्या दरम्यानच ही बेटे पाण्याखाली जातील, यासोबतच हिमालयातील अनेक नद्यांचे उगमस्त्रोत असलेल्या हिमनद्या (ग्लॅशिअर्स) वेगाने वितळत चालल्याने हिमालयातून उगम पावणाऱ्या सर्व नद्यांना अवेळी पूर येऊ लागले आहेत. वेगाने वितळणाऱ्या या हिमनगामुळे हे सर्व पाणी समुद्रात वाहून जाऊन पुढील काही वर्षांत भारतातील उत्तर प्रदेशासारख्या राज्यांना वाळवंटीकरणाचा धोका निर्माण झाला आहे. मुंबईसारखे शहर समुद्रसपाटीपासून फारतर दीड मीटर उंचीवर आहे. पुढील काही वर्षांत समुद्राच्या पाण्याची पातळी तीन मीटरपर्यंत उंचावणार आहे. त्यामुळे संपूर्ण मुंबईच नव्हे तर भारताचा पूर्व व पश्चिम किनारा व जगातील समुद्रकिनारे असलेली अनेक राष्ट्रांची करोडो एकर जमीन पाण्याखाली जाणार आहे. बांग्लादेशांसारखे देश संपूर्णपणे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

श्रीलंकेतील पाचवी परिषद सार्क किंवा दक्षिण अशियायी राष्ट्रांची परिषद असल्यामुळे बंगालच्या उपसागराला लागून असलेले व अरबी समुद्राला ज्याचे किनारे आहेत, त्या सर्व देशांचे प्रतिनिधी या परिषेदेला उपस्थित होते. प्रत्येक देशातील प्रतिनिधींनी वर उल्लेखलेल्या पर्यावरणीय असंतुलनाचा आपापल्या देशात काय परिणाम होणार आहेत, यावर विस्ताराने चर्चा केली व त्या आधाराने परिषदेने २४ कलमी कोलंबो जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यातील कलमे खालील प्रमाणे :

१. प्रामुख्याने सर्व दक्षिण आशियाई देशामध्ये अणूस्पर्धेला निकराने विरोध केला पाहिजे

२. सर्व महासत्तांच्या प्रभुत्ववादाला विरोध केला पाहिजे.

३. महासत्तांच्या युनोमधील विशेष अधिकार (व्हेटो) नष्ट केले पाहिजेत.

४. सर्व दक्षिण अशियाई देशांनी आपापसांत शांतता व मैत्री करार करून युद्ध नाकारले पाहिजे.

५. सर्व दक्षिण आशियाई देशांनी संयुक्त संरक्षण दले निर्माण करावेत व समान परराष्ट्र धोरण अवलंबवावे.

६. आपापसांतील संघर्षाचे सर्व मुद्दे वस्तुस्थितीच्या आधाराने सोडवावेत.

७. जम्मू-काश्मिरचा प्रश्न हा भारत, पाकिस्तानची सरकारे व जम्मू-काश्मिरमधील लोकांनी समान पातळीवर चर्चा करून सोडवावे.

८. सर्व दक्षिण आशियाई देशामध्ये जमीन, समुद्र व हवाई वाहतूक मुक्तपणे करण्यात यावी.

९. सर्व दक्षिण अशियाई देशातील लोकांना मुक्तपणे एकमेकांच्या देशात जाता-येता यावे.

१०. समान नद्या, जोडलेली जंगले, चरावू कुरणे व पिकाऊ जमीन याबाबत संयुक्त महामंडळे स्थापन करून त्याच्या उपयोगाबद्दल निर्णय घ्यावेत.

११. सर्व दक्षिण आशियाई देशांमध्ये विजेसाठी कॉमन ग्रीड निर्माण करण्यात यावी.

१२. सर्व दक्षिण आशियाई देशांना भेडसावणाऱ्या पर्यावरणीय प्रश्नांचे आव्हान स्वीकारण्यासाठी समान पर्यावरण आयोग स्थापन करण्यात यावे.

इत्यादी मुद्दे असलेले घोषणापत्र एकमताने संमत करण्यात आहे. परिषदेचे उद्घाटन श्रीलंकेचे भाषा आणि संस्कृती मंत्री कॉ. वासुदेव नन्नायकरा यांनी केले. परिषदेचा समारोप सर्व देशांच्या प्रतिनिधी मंडळातर्फे एका प्रतिनिधीनी केले. भारतातर्फे कॉ. विलास सोनवणे यांनी विस्तारपूर्वक समारोप केला. ■

---

## कौटुंबिक हिंसाचार

**■ महत्त्वाचे संपर्क-पत्ता :**

१. मुंबई राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डींग, कलानगर, बांद्रा (पूर्व), मुंबई. फोन क्र. ०२२-२६५९०७३९

२. ह्यूमन राईट्स लॉ नेटवर्क यांचे कोर्ट, नवी दिल्ली, फोन क्र. ०११-२४३७४५०१

**काही महत्त्वपूर्ण दूरध्वनी क्रमांक :**

| | |
|---|---|
| मुंबई | ०२२-२२०२५०२४ |
| दिल्ली | ०११-२३४९०३१८ |
| बेंगलोर | ०८०-६५६२४१५१ |
| चेन्नई | ०४४- २८४४७१०१ |
| कोलकाता | ०३३-२२१४५४८६ |

**काही महत्त्वाची संकेतस्थळे :**

www.swayam.info
www.mavaindia.org
www.fight-back.net
www.wcd.nic.in
www.bellbajao.org
www.lawyerscollective.org
www.aalilegal.org
www.snehamumbai.org
www.jagori.org
www.rahifoundation.org

मागोवा

रमा सावरगावे

# जाहिरातीचे जग आणि स्त्री वास्तव

पावसाळ्याच्या दिवसात आकाशात रंगीबेरंगी इंद्रधनूची कमान दिसायची. ती बघायला आमची खूप गर्दी व्हायची. काहीतरी वेगळा 'रंग' दिसायचे ते दिवस. ऋतुमानानुसार आकाशात अशा रंगछटा आताशा दिसत नाहीत. पाऊसही वेळेवर येत नाही. मग पावसात भिजण्याची 'ती' मज्जा तर दूरच! या सर्वांपासून आपण दूर जातोय, याचेच हे निदर्शक आहे. आधुनिकतेच्या विळख्यात आपण सहजपणे अडकत जात आहोत. माणूस म्हणून आनंदी, समाधानी जगण्याऐवजी 'मानवी यंत्र' म्हणून भौतिक सुख व पैशाच्या मागे धावत आहोत. थोडक्यात 'करिअरिस्टीक' झालो आहोत. पर्यायानं जगण्याचा खरा आनंद गमावून बसलो आहोत.

सध्या फॅशन हे प्रत्येक व्यक्तीच्या मना-मनांत रुजलेलं फॅड आहे. अंधविश्वास, अपुरे शिक्षण, अनुकरनशीलता हे सगळं आपल्या सवयीचा भाग झालेला आहे. टीव्हीवरील मालिका, सिनेमा अन् जाहिरातींतून दिसणारी व वावरणारी प्रत्येक बाब आपण हुबेहुब करत असतो. क्वचित तसं नाही केलंच तर मग आपण सर्वांपेक्षा वेगळे आहोत असं वाटतं. अन् आजूबाजूचं वातावरण, रचना, व्यवस्थापद्धती आपल्याला दुर्लक्षित करते. भिन्नलिंगी स्त्री-पुरुष या दोन जातींमधील स्त्री ही पुरुषाएवढे श्रमात, वैचारिक, व्यवहारिकदृष्ट्या समान असताना सुद्धा स्त्री ही जाहिरातीचे माध्यम म्हणून निःशंकपणे वापरले जाते. कालपर्यंत आजी-आजोबांच्या काळात अतिशय स्वच्छ, सोप्या भाषेत दूरवरची माहिती सर्वांपर्यंत अत्यंत सहज पोहोचवणारा रेडिओ हा आता लुप्तच झाल्यात जमा आहे. अन् जागतिकीकरणाच्या वीस वर्षांच्या या काळात शेकडोंच्यावर टी.व्ही. चॅनल्स आली आहेत. त्यात काही हिंदी-मराठी बातम्यांची, सिनेमा, खेळ, अध्यात्माची, हिंदी-मराठी मालिकांची, इंग्लिश न्यूज, पिक्चर्स आदी चॅनल्सनी आपलं आयुष्य व्यापलं आहे.

वैज्ञानिक विकासात, आर्थिक उत्पन्नात झालेली प्रगती एकीकडे माणसातलं माणूसपण गमावून बसू लागलीय. कृत्रिमपणाचा अतिरेक होत आहे. श्रम, मूल्य मग ते एखाद्या वस्तूचे असो अथवा स्त्रीचं असो वा पुरुषाचं! माध्यमाचा वापर केवळ आपल्यापर्यंत पोहचवणाऱ्या गोष्टी म्हणून पाहिलं जात नाही. तर त्या गोष्टीला छेद देत त्या माध्यमात

असण्याऱ्या व्यक्तिरेखाचं चित्रण रेखाटण्यावर जास्त भर दिला जात असतो, हे मात्र नक्कीच. कारण तिथे तो स्पष्टपणे त्या माध्यमाचा ठळकपणे वापरणाऱ्या समुच्चयावरून दिसतो.

जेव्हा इलेक्ट्रानिक मीडिया अस्तित्वात नव्हता, तेव्हा एखाद्या विषयाची, गोष्टीची, कामाची, अथवा कारखाने, व्यवसाय इत्यादीची जाहिरात करायची असेल किंवा लोकापर्यंत कामाचे महत्त्व, दर्जा, स्थळ, काळ याकरता गटचर्चा, वर्कशॉप, सभा या त्या त्याविषयी अभ्यासपूर्ण ज्ञान व्यक्ती हे व्यवस्थित मांडत असतं. या गोष्टी आता केवळ मोठ्या कंपन्या त्यातील उच्चस्तरात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकरता होणारे वर्कशॉप, एखाद्या महाविद्यालय, शाळा किंवा लोकहितवादी संघटना, संस्था याद्वारे आयोजित केलेली व्याख्याने एवढेच मर्यादित राहिले आहे.

एखाद्या कन्स्ट्रक्शन कंपनीची जाहिरात असेल किंवा रिनीव्हेशन डेव्हलपर्सची जाहिरात असेल. दगड, विटा, सिमेंट, माती याचा वापर करून विकसित करणारी इमारत असेल त्या इमारतीची जाहिरात करण्यासाठी स्त्रीचा वापर केला जातो. इतकेच नाही तर तीन टप्प्यांत स्त्रीचं अस्तित्व दाखवून जाहिरात तयार केली जाते. जुन्या इमारतीच्या ठिकाणी वृद्ध स्त्री व दुसऱ्या बाजूला अगदी नवी कोरी बिल्डींग तयार होतेय, त्या ठिकाणी तारुण्यातली स्लिवलेस टॉप्स व स्लॅक्स घातलेली मुलगी ते घर बघतेय आणि तिसरं चित्र इमारत पूर्ण बांधून तयार झालीय तिथं अगदी ३५ ते ४० वयातील स्त्री म्हणजेच जिवंत हाडामांसाच्या स्त्रीची बरोबरी त्या इमारतीबरोबर तुलना केली जाते.

प्रत्येक मालिका, सिनेमा, जाहिरातीमध्ये स्त्रीच्या कमी कपड्यातील छायाचित्राद्वारे दाखवली जातेय. तिच्या या आर्कषक छायाचित्रावरून सर्वांचं लक्ष खेचून घेऊन जाहिरात होण्याचं कारण भांडवलीकरणामुळं! देशात जितका नक्षलवाद, भ्रष्टाचार, राजकीय, सामाजिक, पर्यावरणीय, अध्यात्मीक, प्रदुषणाचा फैलाव, वातावरण जसं दूषित झालेलं आहे तसं माध्यमातही दूषित वातावरण झालेलं आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.

तसेच इमारतीची जाहिरात आहे असं नाही तर प्रत्येक वेळी प्रत्येक ठिकाणी स्त्रीचाच वापर होतोय त्या जाहिराती लोकांच्या मनावर खूपच रुजल्या आहेत. एखाद्या जाहिरातीत ती स्त्री/मुलगी जे शाम्पू वापरते आणि तिचे केस सुटसुटीत मोकळे दिसतात म्हणजे आपणही तोच शाम्पू वापरावा/घ्यावा आपलेही केस तसेच व्हावे, असं वाटू लागते आणि तेच शाम्पू खरेदी करतात मग त्याचे होणारे परिणाम ह्या नंतरच्या गोष्टी. अन्नपदार्थांच्या बाबतीतही तसंच मॅगी, नूडल्स, पिझ्झा, बर्गर इत्यादी फूड प्रिझर्व्हेटीव्ह पदार्थ असतील त्याची झकपक जाहिरात ही स्त्रीच करतेय, ते पाहून तेच खाल्लं जातंय आणि मग त्यातून आरोग्यावर नकळत होणारे परिणाम या गोष्टी आहेत. कॉस्मेटिक, केमिकल्स, बाहेरील पदार्थ अनेक गोष्टींचा अतिरेक होतोय.

अगदी भिंतीवरील कालनिर्णयचं दीपावलीच्या महिन्यातलं कॅलेंडरचं पान असेल त्यात एखाद्या कंपनीच्या चकल्या, चिवडा मसाला असेल, रेडिमेड पदार्थाची जाहिरात करायची असेल किंवा ती बाजारात येण्याच्या कितीतरी आदीपासून प्रकर्षाने स्त्रीच्या शरीराच्या प्रत्येक भागाचा पारदर्शकपणा दाखवला जातो.

परवा मी रस्त्यावरून जात असताना एक मोठ जाहिरातीचं फ्लेक्स दिसलं त्यात इंटेरीयर डेकोरेटेड फर्निचरची जाहिरात होती एका स्त्रीचं चित्र होतं. घर सजवणं ही संकल्पना फक्त स्त्रीचीच आहे. तिच या गोष्टी करू शकते. ती घरापुरतीच मर्यादित आहे. किंबहुना त्यापलीकडे जाऊन विरोधाभास

निर्माण करणारी जाहिरात किंवा तिचं चित्रणं हे अतिशयोक्तीचं उदाहरण आहे.

जागतिकीकरणाच्या वीस वर्षांत झपाट्याने इतकी प्रगती झाली आहे की, प्रत्येक वस्तूकडे भांडवल म्हणून पाहिले जाते. ग्रामीण वा शहरी भागात घरोघरी टीव्ही पोहोचला आहे. चूक की बरोबर, चांगले की वाईट यापेक्षा दिखाव्याला महत्त्व देऊन तेच आचरणात आणले जाते. सिरियल, सिनेमाचे निर्माते हे भांडवलशाहीचा विचार करणारे, 'प्रोफेशनल' पद्धतीने जीवन जगून ग्रामीण, शहरी भागातील स्त्रिया, मुली, माणसांची आवडनिवड आणि अनुकरणक्रिया अभ्यासून भांडवलीकरणाचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल, या दृष्टीने घटनानुक्रम करण्याचा प्रयत्न करत असतात. मालिकेमध्ये भूमिका पार पाडणाऱ्या स्त्रियांच्या वेशभूषा, केशरचना, दागदागिने, भरगच्च मेकअप दाखवले जाते. ते दागिने मेकअपचे, कॉस्मेटीक, साड्या इत्यादी वस्तूंचे विक्री होऊ शकते. म्हणजेच पुन्हा बाजारीकरणाच्या हेतूने दाखवल्या जाणाऱ्या सिरियल पाहून आपण प्रत्यक्षात तसेच वागण्याचा प्रयत्न करत असतो आणि वस्तू खरेदी करत असतो. म्हणजेच आपण भांडवलीकरणाला नकळतपणे स्वतःहून बळी पडत असतो.

विशिष्ट वयात ज्या ज्या गोष्टीचं आकर्षण असतं त्या त्या गोष्टी, वस्तू वापरात आणून त्यावर जास्त भर दिला जातो. आपणही ते पाहून करमणुकीचं साधन म्हणून खरं, खोटं आणि वास्तव याचा जरासाही विचार न करता त्या दिखाव्यातील त्या त्या व्यक्ती ते खरेदी करण्याचे स्वप्न बघत असतात. आणि ते प्रत्यक्ष तसं करत असतात, ते मिळवण्यासाठी वाट्टेल ते करत करत असतात.

भले मोठे राजवाडे, बंगले हे पाहून प्रोफेशनल पद्धतीनं जीवन बनत चाललं आहे. ही सगळी भौतिक सुखे गरज बनू लागली आहेत. आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी माणूस वाट्टेल ते करतोय. आपण जिथं जन्मलो, आपले ध्येय काय? थोर क्रांतिकारी पुरुषांनी इतक्या संघर्षांनंतर मिळवलेल्या स्वातंत्र्याचे बाजारीकरण करू लागलो आहे.

एकता ऐवजी भेद निर्माण होऊ लागलेत. नात्यानात्यांत, समाजात, जातीजातींत, देशादेशांत आणि स्त्रीपुरुष या लिंगभेदांतसुद्धा आता बाजारीकरण झालेलं आहे. आधुनिकतेचा नुसताच स्त्रीवाद आणि या सिनेमा, मालिकातून स्त्रीचं बाजारीकरण हे सर्व स्तरातून होत आहे.

आजकाल सिरियल, सिनेमात शेतकऱ्याची झोपडी, बैलगाडी, सायकल किंवा फाटकं वस्त्र हे दाखवतच नाहीत. कारण या दाखवण्यातून त्यांना काहीच नफा नाही ना.

ग्रामीण भागात विहीर खोदण्याचं काम असेल, शेतात पेरण्यांचं, कोळपणीचं, राशीचं काम असेल तिथं स्त्रीपुरुष असा भेदभाव न करता ती फक्त व्यक्ती (माणूस) म्हणून पाहिलं जातं. किंवा तिथं ती स्त्री त्या पद्धतीनं श्रम करत असते.

उदा. विहिरीचा गाळ उपसण्याचं काम असेल तर ती मनुष्यबळाच्या सोयीप्रमाणं कधी तिला विहिरीच्या वरच्या भागावर, तर कधी तळात, तर कधी मध्यंतरी थांबावे लागते. तेव्हा तिला मी स्त्री आहे याचं किंचितही भान नसतं किंवा तिला तू स्त्री आहेस, असा भेदभावही केला जात नाही. तिथे स्त्रित्वाच्या तिच्या शारीरिक भेदाकडे कोणाचेच लक्ष नसते, कारण ती स्वतः श्रम समतेचं प्रतीक असते, बनते.

मात्र काम झाल्यानंतर तिला मी स्त्री आहे, हे भान येतं आणि ती स्वतः पदर घेण्यापासून ते केस ठेवणपर्यंत जबाबदारीपूर्वक काळजी घेते. म्हणजेच तिथं कोणी तिच्यावर दबावही आणत नाही आणि तिही स्त्रित्वाचा आव आणून दिखावा करत नसते.

पण या २० वर्षांच्या काळात झपाट्याने वाढ झाली. तो अतिरेकच झालेला दिसतो. नुसताच पैसा पैसा अन् भौतिक सुख हीच अंतिम गरज होऊन बसली आहेत. एकीकडे स्त्रीचं शरीर असेल किंवा स्त्री ही प्रत्येक वस्तूचं प्रदर्शन मांडणारी, जाहिरात करणारी केंद्र झाली आहे. मग ते सर्वांचं लक्ष वेधून घेण्यासाठी होत असलेल्या तिच्या पोशाख, केशरचना, तिची ठेवण, हे बाजारीकरणाचा मुख्य भाग झालेला आहे.

मग, स्त्री म्हणजे वस्तूचं विक्रीयोग्य बाजारीकरण, स्त्री शारीरिक सुख देणारी. ती सर्व व्यवस्थेला बळी पडली आहे. यात कोण्या एका समाजाचा, स्तराचा, व्यक्तीचा दोष नसून व्यवस्थेचा दोष आहे. आणि त्यात स्त्री ही पूर्णपणे 'बळी' ठरत आहे.

वाढत्या अत्याचाराच्या घटना असतील, नात्यांतील व्यक्तीकडून होणारा बलात्कार किंवा सामूहिक बलात्कार, कामाच्या ठिकाणी बॉसकडून होणारा अत्याचार, बसमध्ये व सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड, हे आता रोजचं झालेलं आहे.

एकीकडे वेगवेगळ्या संघटना, पक्षांनी दोषीला फाशीच्या शिक्षेची मागणी करत आहेत, पण तेही सर्वजण आपापल्या पक्ष प्रतिष्ठेसाठी, नावासाठी. आंदोलनं, मोर्चे याशिवाय पर्यायी मार्ग निवडत किंवा मार्ग शोधणं हे मुश्किलीचं वाटतं.

पण हे सर्व घडताना एकच पर्याय आहे स्त्रीनं भौतिक सुख हे अनन्य समजून, बाजारीकरण करणं थांबवून वास्तववादी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा व मीडिया, मॉडेल्सचे अनुकरण करणे थांबवावे. तासन्तास टीव्हीपुढे रिमोट हातात घेऊन सिरियल, सिनेमे, जाहिराती पाहत बसण्यापेक्षा पर्यायी मार्ग अवलंबवावा.

पेपर, मासिके, थोर पुरुषांची चरित्रे, भाषणे इ. वाचावे. करमणुकीचे साधन हे टीव्ही बणण्याऐवजी ते आपण जेव्हा वापर करू तेव्हा आपण काय घ्यायचं, काय पाहायचं हे ठरवलं पाहिजे. म्हणजे ते आपण साध्य म्हणून वापरलं पाहिजे. ■

पान न. २१ वरून

तोडणे वा त्यांना नपुंसक करणे अशासारख्या रानटी शिक्षांना लोकशाही व्यवस्थेत स्थान असणार नाही, हे समजून घेत तशी मागणी करण्यामागे आपल्या मनातील सुप्त हिंसा, हतबलता वा नैराश्य-राग तर नाही ना, याचाही शोध घेतला पाहिजे.

चला, मुली-स्त्रियांकडे केवळ मादी (उपभोगाचे साधन) व माता म्हणून न बघता माणूस म्हणून बघण्याचा संकल्प करूया! पुरुषांप्रमाणेच त्यांनाही सर्व हक्कांचा उपभोग घेता येईल यासाठी काम करूया!! राजकीय नेते-सरकारला जाब मागूया आणि स्वत: कोणतीही हिंसा न करण्याचा व सहनही न करण्याचा निर्धार करूया!! ■

प्रतिभा शिंदे, शहादा, नंदुरबार.
मोब. ९४०४५५९५१०

सगुणा

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

सगुणा चॅरिटेबल ट्रष्ट
७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट
२०७९, सदाशिव पेठ,
विजया नगर कॉलनी
(एस.पी. कॉलेजच्या पाठीमागे)
पुणे - ४११०३०
दुरध्वनी- ०२०-२४३३७१२५

(अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.)

web site : www.sagunatrust.org
Email : shobhakarande62@gmail.com

वेध २

शरिफा बाले

# लोकप्रिय चित्रपटातील मुस्लीम पात्रे

चित्रपट, मालिका, वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिनी इ. प्रसारमाध्यमांतून समाजात घडणाऱ्या घडामोडींचे चित्र दिसत असते. यातीलच एक सर्वांचं आवडतं माध्यम म्हणजे चित्रपट. ज्याला मनोरंजनाचे माध्यम म्हणून बघितले जाते.

एखाद्या कहाणीवर आधारित एखादा चित्रपट तयार केला जातो आणि जर त्याचे कथानक हे आपल्याला आपल्याच जवळचे वाटले तर आपण वारंवार ते चित्रपट पाहत असतो. कारण त्यातल्या एखाद्या कथानायकांमध्ये आपण आपली प्रतिमा पाहतो. यालाच ऑल टाईम फेवरेट मुव्हीज म्हणतात. अशा चित्रपटांची यादी करावयाची ठरल्यास खूप मोठी यादी तयार होते.

यातीलच, 'हम आपके है कौन' आणि 'हम साथ साथ है' या चित्रपटांना जास्तच लोकप्रियता मिळालेली आहे. कारण, पारिवारिक चित्रपट म्हणून यांच्याकडे बघितले जाते. भारतातील हिंदू कुटुंब व्यवस्थेचे चित्र त्यात स्पष्टपणे दिसते. पण कुठलाही चित्रपट बनत असताना त्यात समाजातील चित्रणही होत असते. आणि या दोन्ही चित्रपटातही अशाच पुरुषसत्ताक, उच्चवर्गीय, जमातवादी समाजव्यवस्थेचे चित्रण झाले आहे.

१९९४ साली प्रदर्शित झालेल्या 'हम आपके है कौन' या चित्रपटाचा विचार केला तर, प्रेम आणि निशा यांच्या पारिवारिक प्रेम कहाणीवर आधारित हा चित्रपट आहे. प्रेम आणि निशा हे दोघेही खूप खोडकर आणि मस्तीखोर असतात. प्रेमचे आई बाबा तो लहाण असतानाच वारलेले असतात. त्यांचे मोठे काका कैलाशनाथ हेच प्रेमला आणि त्याच्या मोठ्या भावाला (राजेशला) आई-वडिलांसारखे सांभाळत असतात. राजेश त्यांचा फॅमिली उद्योग सांभाळत असतो आणि घरात सर्वजण त्याच्या लग्नासाठी मुलगी शोधत असतात.

प्राध्यापक सिद्धार्थ चौधरी हे त्याचे जवळचे मित्र असतात. त्यांना पूजा आणि निशा या दोन मुली असतात. हे दोन्ही परिवार खूप वर्षांनी भेटतात आणि या भेटीतच ते राजेश आणि पूजाच्या लग्नाचा प्रस्ताव ठेवतात. राजेश आणि पूजा यांच्या लग्नात प्रेम आणि निशा यांची भांडण मस्ती सुरूच असते. यातच ते एकमेकांना आवडू लागतात. पूजा गरोदर असते. पण तिच्या डोहाळ जेवणामध्ये काही कारणास्तव प्रा. चौधरी येऊ शकत नाहीत म्हणून

ते निशाला पाठवतात. निशा पूजाला मदत करण्यासाठी येते आणि पूजाचे बाळंतपण होईपर्यंत तिथेच राहते. या दरम्यानच निशा आणि प्रेम एकमेकांच्या प्रेमात पडतात. लवकरच पूजा एका छान मुलाला जन्म देते. दोन्ही कुटुंब एकत्र येऊन आपला आनंद व्यक्त करतात.

जेव्हा निशाला परत जाण्याची वेळ येते तेव्हा सर्वांना वाईट वाटतं. खास करून प्रेमला. ते एकमेकांना समजावतात की, लवकरच ते एकत्र येतील आणि सर्वांना त्यांच्या प्रेमसंबंधाची कल्पना देतील.

त्यानंतर एक दिवशी पूजा तिच्या आई वडिलांसोबत राहायला जाते. तेव्हा पूजाला निशा आणि प्रेमच्या प्रेमसंबंधाविषयी कळते आणि तिला खूप आनंद होतो. ती निशाला तिचा नेकलेस शगून म्हणून देते. ही बातमी तिला राजेशला द्यायची असते. तेवढ्यात फोन वाजतो आणि पूजा फोन घ्यायला जाते तेव्हा ती पायऱ्यांवरून घसरून पडते. त्यातच तिचा मृत्यू होतो. सर्वजण या अपघाताने दुःखी होतात आणि त्यांना बाळाची काळजी वाटू लागते.

दोन्ही कुटुंब मिळून विचार करतात की, निशा आणि राजेशचे लग्न केलं तर बाळाला आई मिळेल. पण निशाला हे माहीत नसतं की तिचं लग्न राजेशशी होणार आहे. तिचा हाच समज असतो की तिचं लग्न प्रेमशी होणार.

लग्नपत्रिकेवरील नावावरून तिला कळतं की तिचं लग्न राजेशशी होणार आहे. प्रेम आणि निशा मिळून विचार करतात आणि आपल्या प्रेमाचा त्याग करतात. पूजाने दिलेला नेकलेस निशा प्रेमला परत करते. पण ते राजेशच्या हाती पडतो. त्याला सगळी हकिकत कळते आणि तो निशाच प्रेमशी लग्न लावतो. अशाप्रकारे नेहमीप्रमाणे चित्रपटाचे आनंदीत शेवट होते. अशी ही कथा. ज्यामध्ये इतरही अनेक घटक आहेत आणि खरंतर त्या इतर गोष्टींमुळेच त्या कुटुंबामध्ये समाजाचे चित्रण दिसते.

उदा. मालक आणि नोकराचे संबंध, त्या घराशी जोडलेले मित्रपरिवार आणि नातेसंबंध यातील संवाद आणि कुटुंब प्रमुखाची भूमिका. यामुळेच त्यात त्यावेळच्या (१९९४) भारतीय कुटुंबाचे चित्रण होते.

१९९४ च्या काळात हिंदू-मुस्लीम नातेसंबंधा विषयी घट्ट विण होती. एकमेकांबद्दल आदर होते. समाजात एक स्थान होते. मित्रत्वाचे नाते जपले जात होते. या सर्वांचे चित्रण 'हम आपके है कौन' चित्रपटामध्ये दिसते.

उदा. डॉक्टर चाचा आणि चाची हे त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात हजर असतात. त्यांना आग्रहाचे निमंत्रण असते.

पूजाचे बाळंतपण हे डॉक्टर चाचीच्या दवाखाण्यातच होते. घरातील प्रत्येक नातेवाइकांशी त्यांची बांधीलकी असते. एकमेकांवर तेवढाच रुसण्या फुगण्याचा हक्कही असतो.

या सर्वांवरूनच आपल्याला त्या काळातील हिंदू मुस्लीम संबंधाविषयी कळते. पण जसजसा काळ पुढे गेला तसतसे अनेक धर्मांध संघटनांनी वेगवेगळे अपप्रचार करून हिंदू-मुस्लीम संबंधामध्ये एक फट निर्माण केली. काळाप्रमाणे ती फट अधिकच वाढत गेली. त्या परिणाम स्वरूप आज प्रत्येकाच्या मनात मुस्लीम लोकांविषयी शंका निर्माण झालेली दिसते. अशाप्रकारचा प्रचार आणि प्रसार चित्रपटांमधून सुद्धा होताना दिसतो. याचं उदा. म्हणजे 'हम साथ साथ है'

'हम साथ साथ है' हा चित्रपट १९९९ मध्ये प्रदर्शित झाला. हासुद्धा भारतीय कुटुंब व्यवस्था दर्शवणारा चित्रपट आहे. या मध्ये रामकिशन आणि ममता यांच्या लग्नाचा वाढदिवस असतो. त्या कार्यक्रमासाठी सर्व नातेवाईक एकत्र येतात. त्यांची चारही मुले म्हणजे राजेश, प्रेम, विवेक, संगीता ही

या कार्यक्रमाची तयारी करत असतात. या कार्यक्रमात त्यांच्याच ऑफीस पार्टनरची मुलगीही येते. आणि रामकिशन यांच्या मोठ्या मुलासाठी तिचे बाबा मागणी घालतात. त्या दोघांचं लग्न होत आणि हनीमूनसाठी ते त्यांच्या जुन्या गावी रामगडमध्ये जातात. तिथेच त्यांच्या दोन्ही मुलांचा साखरपुडा होतो. यानंतर रामकिशन यांची मुलगी सासरी जाते. काही दिवसांनी कळतं की तिच्या सासरच्या लोकांनी तिला आणि तिच्या नवऱ्याला वेगळं काढलं आहे. सर्व मालमत्तेमधून बाहेर काढलं आहे. हे बघून रामकिशनच्या पत्नी ममताला खूप दुःख होत.

या परिस्थितीचा फायदा घेऊन ममताच्या मैत्रिणी तिला तिच्या घरात फुट पाडायला लावतात. तेव्हा कळत की, तिचा मोठा मुलगा हा सावत्र मुलगा आहे. तिच्या मनातील हा मत्सरभाव उफाळून येतो आणि घरात भांडणे सुरू होतात. पण मोठा मुलगा सामंजस्य दाखवतो आणि गावाकडे निघून जातो. पण तो जात असताना विवेक हासुद्धा त्याच्या बरोबरच जातो. प्रेमला हे सगळ जेव्हा कळतं तेव्हा तो ही आपल्या मोठ्या भावाला भेटायला गावाकडे जातो.

तेव्हा कळते की राजेशची बायको गरोदर आहे. प्रेम जेव्हा घरी येतो तेव्हा त्याची आई त्याला समजावण्याचा प्रयत्न करते. पण काहीही न ऐकता आईला तिची चूक समजावून सांगतो. संगीताच्या घरी सर्वकाही ठीक होतं. त्यांचा भाऊ आपल्या चुकीची माफी मागून त्यांना परत घरी घेऊन जातो. तोपर्यंत इकडे ममतालाही आपली चूक कळते. राजेशला एक छान गोंडस बाळ होते आणि भेटण्याच्या निमीत्ताने सर्व कुटुंबीय पुन्हा एक होतात. पुढे मुलांची लग्नही होतात. अशाप्रकारे पुन्हा एकदा आनंदाने चित्रपटाचे शेवट होते.

या चित्रपटातही खूप वेगवेगळे पूरक पात्रे आहेत. ज्यातील प्रमुख पात्र हा अन्वर आहे. अन्वर हा राजेशचा मित्र असतो. नेहमी त्याच्या घरी पडिक असतो. त्याला सर्व घरचे लोक कामावर पाठवत असतात. पण हा स्वतःला निर्लज्ज म्हणून तिथेच राहत असतो. असे हे पात्र खरे तर या कथेमध्ये समरस होताना दिसत नाही. तर फक्त उगीचच जबरदस्तीने हे पात्र निर्माण करून आणि त्याला मुस्लीम धर्मिय बनवून या पात्राच्या माध्यमातून एक वेगळाच संदेश द्यायचा आहे का? असा प्रश्न निर्माण होतो.

'हम आपके है कौन' आणि 'हम साथ साथ है' या दोन्ही चित्रपटांचा विचार केला तर यामध्ये बरेच साम्यही आहेत आणि भेदही आहेत.

सर्वांत प्रथम साम्य म्हणजे, हे दोन्ही चित्रपट राजश्री प्रॉडक्शनची आहेत. उत्तम कौटुंबिक चित्रपट म्हणून ते सर्व सामान्याच्या पसंतीचे आहेत. प्रसिद्ध आहेत. दोन्ही चित्रपटातील कुटुंबेही उच्चवर्गिय दाखवले आहेत. या दोन्ही चित्रपटात मित्र म्हणून मुस्लीम पात्र घेतले आहेत. या दोन्ही चित्रपटातील बहुसंख्य कलाकारही एकच आहेत.

पण यात महत्त्वाचा फरक म्हणजे 'हम आपके है कौन'मध्ये डॉक्टर चाचा आणि चाची जितक्या सहजतेने संपूर्ण कथानकामध्ये समरूप होऊन जातात. तितक्या सहजतेने 'हम साथ साथ है'मधील अन्वर हे पात्र एकरूप होताना दिसत नाही.

१९९९ सालचा हा चित्रपट. मुस्लीम धर्मियांविषयी एक उपरेपणाची आणि जबरदस्तीने जोडले गेलेल्या भावनेचा प्रचार आणि प्रसार करताना दिसते. जर या चित्रपटाच्या पोस्टरविषयी विचार केला तर 'हम आपके है कौन'मध्ये डॉक्टर चाचा हे कैलाशनाथ यांच्या बरोबरीनेच हातात हात घालून उभे असताना दिसतात.

उदा. मायेनी माये, मुंडेर पे तेरी...या गाण्यात.

तर ‘हम साथ साथ है’ मध्ये अन्वर हा प्रत्येक वेळेस पायाशी पडून लोळन घेताना दिसतो. यातूनच चित्रपटाच्या माध्यमातून समाजात मुस्लीम धर्मियांविषयी उपरेपणाची भावना पेरताना दिसते.

या सर्वांचा एकत्रित विचार केला तर असेच दिसते की, सामान्य माणसांत हिंदू-मुस्लीम संबंधा विषयी जे मित्रत्व आहे त्यास कुठेतरी तडा देऊन त्याला उपरेपणाचा आणि अविश्वासाचा रंग दिला जात आहे व त्याचा प्रचार आणि प्रसार होताना दिसत आहे. ■

---

## कविता

सौ. शोभा करांडे

### सोनू

*मऊ धुक्याच्या दुलईत,*
*ऊबदार माईच्या कुशीत*

*निजेत सूर्याला उखाणा घाली,*
*दंवाला केशरी स्वप्न दावी*

*निळ्या नयनांना, मोरपिशी झालर*
*ओल्या जावळाची रेशमी कुरवाळ*

*ओठ झरत्या दुधाचे ओले,*
*गाल मऊ सायीचे गोळे*

*मुठी चंद्र-तारे-घेतले,*
*वेदनेचे सारे घाव मिटले*

*सोनुबाळ चंद्र-सूर्याचं तेज,*
*आईच्या कुशी गोकुळ साजं*

■

## कविता

कु. उमा ढेपे

### मी

*या सावळ्या संध्याकाळी*
*प्रकाश पेरीत आळवली*

*बासरी मधुर रसभरली*
*भीती अंधाराची उतरवली*

*तू क्षितिज बांधुनी डोळ्यांना*
*अगणित पाऊले चालतोसी*

*मी फिरूनी साखळ्या वितळवते*
*भर माध्यान्ही सूर्यही पेटतो*

*मी एकट अलोट स्वप्नांची*
*रांगोळी मांडून बसले*

*तू मुकुटांचे मोती शोधत*
*भोवऱ्यात हरवून जातो*

*एक नाव किनाऱ्याला*
*थबकतं थबकतं राहते*

*कळसावरून एक ओळी,*
*अभंगाला शोधते*

■

कविता

सौ. शोभा करांडे

## आपलं !

आपलंच जंगल-जमीन आणि पाणी
इंद्रधनुषी-सण-उत्सव आपलीच गाणी
थिरकणारे पाय आणि वाद्यांवरचे ताल,
भाषा आपली, लिपी संकेताची बोल-चाल
भिंतीवरची चित्रे आणि दारावरची नक्षी,
आकाशाची निळाई, मुक्त मोकळे पक्षी
धरणीची हिरवाई जीव-प्राण रक्षी,
अनेकविधी रंगांची, युगायुगांची साक्षी
सहवासावरच्या शिखरावरची निरागसता निसर्गाची,
नवी नव्हाळी ओथंबुनी, थेंब अमृताचे ओसंडती
अपेक्षांचे रान जळे ना इच्छांचे धुराळे,
सुख-आनंदाचा कल्लोळ, जसा तसेच दुःखाचे उमाळे,
जगण्याचेच मोहोर फुटती, डोही अनंत सोहळे
हळूहळू अन् रुतत गेले, बाण विषारी टोकांचे
भिनत चालली नशा विषाची, पुसत पाऊले मुक्तीची
आसक्तीचे अगणित भाले, टोचित क्षितिजाला,
उथळ-स्वैरता-भ्रष्ट वारे, भिववी मनामनाला
दुखरे डोळे-बधीर प्रज्ञा-अखंड तृष्णा
स्वप्नामधल्या सलज्जतेलाही घाली बांध
मिटून गेले पंख मनाचे, स्तब्धच संधिकाल!
वितळत-वितळत संथ उतरते, रात्रही वेडी निथळते!
काच धुक्याच्या नगरीत ध्येयाचे, असंख्य मोती हरवते
कंपित उषाही संयमी निर्धाराने, सूर्य आजचा ठेऊन जाते
ज्ञानर्षी हो प्रकाश पिऊनी सगुणा, मनुष्यत्वाची मशाल हाती घेते

■

# पाककृती

सौ. वासंती ढवळे

आपल्या काही मैत्रिणींना बिर्याणीची पाककृती हवी आहे. आपण त्यांना दम बिर्याणीची कृती देऊ या. आपण बिर्याणी शाकाहारी आणि मांसाहारी या दोन्ही पद्धतींनी सांगणार आहोत. यासाठी लागणारे साहित्य :

पाव किलो तांदूळ (जुना बारीक बासमती असल्यास उत्तम), शाकाहारी असल्यास पनीर १०० ग्रॅम, पाव किलो फ्लॉवर, ढोबळी मिरची, गाजर, मटार इत्यादी १५० ग्रॅम, बारीक उभा चिरलेला १५० ग्रॅम कांदा लालसर कुरकुरीत तळून घेणे. शंभर ग्रॅम कांदा बारीक चिरून घेणे. दोन मोठे चमचे अद्रक लसूनची पेस्ट - १ टी स्पून लाल मिरचीची पेस्ट एक चमचा लाल मिरची पावडर, एक चमचा गरम मसाला पावडर, दोन-तीन हिरव्या मिरच्या बारीक चिरलेल्या-भरपूर कोथिंबीर बारीक चिरलेली. एक चमचा धना पावडर, थोडीशी दालचिनी तुकडे. तीन लवंग, पाच विलायची. शंभर ग्रॅम दही, अर्धा लिटर पाणी, थोडासा पुदिना बारीक चिरलेला. अर्धा ग्रॅम केसर कोमट दुधात मिसळून शुद्ध तुप, १०० ग्रॅम रिफाईड तेल, चार टोमॅटो बारीक चिरून घेणे.

कृती : बासमती तांदूळ अर्धा तास धुवून नितळत ठेवणे. एका पातेल्यात तादंळाच्या चारपट पाणी घेऊन उकळत ठेवणे. त्यामध्ये दालचिनीचे तुकडे, लवंग व दोन-तीन इलायची व एक तेज पत्ता टाकून एक चमचा मिठ टाकणे. तांदूळ निथळून उकळत्या पाण्यात टाकून अर्धवट शिजवून घेणे. मोठ्या चाळणीत तांदूळ गाळून घेणे. गार पाण्याने तांदूळ चाळणीतच धुणे.

दुसऱ्या पातेल्यात तेल टाकून कांदा लालसर करून त्यामध्ये टोमॅटो टाकून परतणे. आलं-लसणाची पेस्ट टाकून परतून घेणे, चांगले परतल्यानंतर त्यामध्ये लाल मिरची पेस्ट टाकून, मिरची पावडर, धना पावडर, अर्धा चमचा गरम मसाला पावडर - हिरव्या मिरच्या थोडीशी हळद टाकून सगळ्या भाज्या, पनीरचे चौकोनी तुकडे लालसर तळून तेही टाकणे. सगळं चांगलं परतून त्यामध्ये मीठ व दही घालणे.

मांसाहारासाठी पाव किलो चांगले मांडीचे मटण घ्यायचे. ते स्वच्छ धुवून मध्यम चिरून वरील मसाल्यात चांगले परतून मऊ शिजवून घ्यायचे. एका पसरट जाडबुडाच्या पातेल्यात तळात पहिल्यांदा शिजलेला भात पसरवायचा त्यावर शिजवलेले मटण पसरवायचे. थोडासा रस्सा व मटण ठेवायचे. पसरलेल्या मटणावर कोथिंबीर, पुदिना पसरवायचा. सुरीने किंवा चमच्याने आरपार छेद देऊन त्यामध्ये थोडं-थोडं तूप व गरम मसाला टाकायचा. सगळ्यात वरती केशर शिंपडून, कणिक लावून पातेल्यावर झाकण बंद करायचे. तवा मोठ्या गॅसवर तापत ठेवून त्यावर बिर्याणीचे भांडे ठेवायचे. पंधरा मिनिटांनी वाफ बाहेर आली की, गॅस बंद करायचा. अर्धा-एक तास बिर्याणी मुरू द्यायची. दही कांद्याबरोबर वरून तळलेला कांदा पेरून बिर्यानी वाढायची. वरील साहित्यात चार माणसांना वाढता येईल. शाकाहारींनी मटणऐवजी भाजी-पनीर मिश्रण वापरावे. ■